● पंढरपूर ● रविवार, १ डिसेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
● वर्ष २९ ● अंक - १९१





पाटील वस्ती(फोंडशिरस) शाळेला सर्वसाधारण विजेतेपद PII





पालखी प्रस्थानाने खर्डी भंडाऱ्याची सांगता PIII


## » At a Glance

### फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत यासाठी विठ्ठलाला साकडं



**सोलापूर :** राज्याच्या मुख्यमंत्री आणि मंत्री व्हावं यासाठी देवाकडे प्रार्थना करत आहेत. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी सोलापुरात विठ्ठल-मुख्यमंत्रिपदी कोण? याबाबतची अधिकृत घोषणा अद्यापर्यंत झालेली नाही. अशातच महायुतीतील नेते आणि कार्यकर्ते हे आपल्या नेत्याने रुक्मिणीला साकडं घातलं आहे. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी विठ्ठल-रुक्मिणीला साकडं घातलं. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे विठ्ठल मंदिरात भजन किर्तन करत विठ्ठलाला साकडं घातलं आहे.

### स्कूल बस खरेदीत ५. ३० लाखांचा कर थकित



**बार्शी :** बार्शीतील वाणी प्लॉट येथील रहिवासी अमर हिरालाल शिलवंत (वय ४६) यांनी येरमाळा येथील परिचितांकडून खरेदी केलेल्या स्कूल बसच्या व्यवहारात मोठी फसवणूक झाल्याचा आरोप करत शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. शिलवंत यांना सदर वाहन खरेदी केल्यानंतर, ५ लाख ३० हजार रुपयांचा थकित कर असल्याची प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) नोटीस आली, तेव्हा त्यांना या फसवणुकीची जाणीव झाली.

### राजेंद्र राऊत यांनी घेतला चिंतन मेळावा



**बार्शी :** शिवसेना शिंदे गटाचे पराभूत उमेदवार राजेंद्र राऊत यांनी कार्यकर्त्यांचा चिंतन मेळावा घेतला. राजेंद्र राऊत यांच्या पराभवाची कारणे शोधण्यासाठी महायुतीच्या सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांचा राजेंद्र राऊत यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार दिलीप सोपल यांनी सहा हजार मतांनी पराभव झाला होता. मतदारसंघातील महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मांडली पराभवाची कारण बार्शीतील जनतेने अफाट प्रेम केलं, मात्र माझ्याकडून काही चुका झाल्या असतील तर त्याच्यात दुरुस्ती करणार असल्याचे सांगितले.

### कुंभारी जवळ अपघातात तरुणाचा मृत्यू





**सोलापूर:** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील गावात जाणाऱ्या सर्व्हिस रोडवरील गेनसिद्ध मंदिरासमोर दुचाकीवरून पडून जखमी झालेल्या मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात बुधवारी रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास घडला. परशुराम सिद्धाराम चाबुकस्वार (वय 35, रा. कुंभारी) असे मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. अपघात झाल्यानंतर त्यांना वडिलांनी शेतातील वस्तीवर नेले होते. तेथून बेशुद्ध अवस्थेत वळसंग पोलीस ठाण्याचे हवालदार चव्हाण यांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र मध्यरात्री त्यांचा मृत्यू झाला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती

# राज्यात 5 डिसेंबरला स्थापन होणार नवे सरकार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून येत्या ५ डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. याबाबत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली.

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. २३ नोव्हेंबर रोजी एकत्रित निकाल जाहीर झाले. २८८ सदस्य असलेल्या विधानसभेत २३५ जागा महायुतीच्या वाट्याला गेल्या. त्यामुळे महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. परंतु, निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतरही महायुतीकडून सत्ता स्थापनेकरता उशीर करण्यात आला. मुख्यमंत्री आणि इतर मंत्रिपदाकरता जोरदार रस्सीखेच अद्यापही सुरू आहे. त्यामुळे राज्यात नवं सरकार कधी स्थापन होणार असा प्रश्न सातत्याने विचारला गेला.

दरम्यान, आता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्स पोस्ट करून शपथविधीबाबत महत्त्वाची माहिती दिली. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता शपथविधी सोहळा होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानात हा सोहळा रंगणार असून यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही येणार आहेत.

राज्यात मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून अद्याप तिन्ही पक्षांमध्ये सहमती झालेली नाही. महायुती सरकारच्या रचनेबाबत अमित शहा यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गुरुवारी रात्री सुमारे तीन तास बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच असतील, हे स्पष्ट करण्यात आले. पण काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मागण्यांमुळे गाडी अडल्याचे सांगण्यात येते. एवढे प्रचंड बहुमत मिळूनही विधिमंडळ नेता निवडीसाठी आमदारांची साधी बैठकही अद्याप होऊ शकलेली नाही.

# ‘ईव्हीएम’ बाबत शरद पवार यांनाही संशय

## ‘ईव्हीएम’ सेट करण्याची दाखवली होती प्रात्यक्षिके; विश्वास ठेवला नाही, परंतु आता तथ्य

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काही लोकांनी ‘ईव्हीएम’ कसे सेट केले जाते, याचे आम्हाला प्रेझेंटेशन दिले होते. आमची कमतरता होती, की आम्ही त्यावर विश्वास ठेवला नाही; पण आता निवडणुकीत इतके काही टोकाचे होईल, असे कधी वाटले नव्हते. आम्ही यापूर्वी कधी निवडणूक आयोग या संस्थेवर संशय व्यक्त केला नाही; पण निकालानंतर आता तथ्य दिसत आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी ‘ईव्हीएम’ हॅक होण्याची शक्यता व्यक्त केली.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांच्या आत्मक्लेश आंदोलनाला भेट दिली, तेव्हा पवार बोलत होते. ९५ वर्षीय आढाव यांच्या या आंदोलनाची दखल राजकीय नेतेही घेत आहेत. आज सकाळी पवार यांनी महात्मा फुले वाड्यात आढाव यांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच या भेटीनंतर माध्यमांशी बोलत असताना निवडणुकीतील गैरप्रकाराबाबत लोकांमधून उठाव होण्याची आता गरज असल्याचे ते म्हणाले.

पवार म्हणाले, की विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर त्यासंबंधीची अस्वस्थता संपूर्ण राज्यात दिसत आहे. निवडणुकीत झालेली अनियमितता पाहून आढाव यांनी उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीत झालेला


» पान ३ वर


### विरोधकांना बोलू दिले जात नाही

● देशाची सूत्रे ज्यांच्या हाती आहेत, त्यांना याची काही पडलेली नाही. संसदेत आम्ही मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, तर आम्हाला बोलू देत नाहीत. रोज सकाळी ११ वाजता विरोधी पक्षनेते आपले म्हणणे मांडण्यासाठी बोलायला उभे राहतात; पण त्यांना बोलू दिले जात नाही. मागच्या सहा दिवसात संसदेत देशाच्या एकाही प्रश्नाची चर्चा होऊ शकलेली नाही," असे पवार म्हणाले.

# अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान; नव्या शासनासमोर 2796 कोटीचा प्रस्ताव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात राज्यात अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. यामुळे पिकांचे नुकसान झाले. याचे पंचनामे करण्यात आले असून नव्या शासनासमोर 2796 कोटीचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. यामुळे नुकसान भरपाई केव्हा मिळणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांनी शेतामध्ये पिकांची लागवड केली होती. मात्र ऑगस्ट- सप्टेंबर महिन्यात राज्यात अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकरी आर्थिक संकटात सापडला. यामुळे शेतकऱ्यांनी पिकाचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. त्यानुसार तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासन व कृषी विभाग यांना पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पंचनामे करण्यात आले. यामध्ये राज्यातील दोन लाख 54 हजार शेतकऱ्यांच्या शेतातील 2796 कोटी रुपयाचे नुकसान झाले असल्याचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवून देण्यात आला. मात्र प्रस्ताव दाखल झाल्यानंतर लगेच विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. यामुळे या प्रस्तावाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले. विधानपरिषद निवडणूक पार पडली असून यामध्ये महायुतीची सत्ता आली आहे. आता नवीन येणाऱ्या शासनासमोर 2796 कोटीचा प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे. या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्यानंतर शेतकऱ्यांना रक्कम मिळणार आहे. यामुळे रक्कम केव्हा मिळणार याकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत.



### सोलापुरात लवकरच हेल्मेट सक्ती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दुचाकी चालकासोबत मागे बसणाऱ्या व्यक्तीलाही हेल्मेट घालावे लागणार असून याबाबतची हेल्मेट सक्ती लवकरच सोलापूर शहर आणि जिल्ह्यात लागू होणार आहे. विना हेल्मेट दुचाकीस्वार व मागे बसणारा सह प्रवासी यांचा अपघात, मृत्यूमुखी तसेच जखमींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. यावर आळा घालण्यासाठी आता संपूर्ण राज्यात दुचाकीवर मागे बसणाऱ्यालाही हेल्मेट सक्ती करणारे परिपत्रक पोलीस प्रशासनाने काढले आहे. यामुळे सोलापूरकर मात्र चांगलेच धास्तावले आहेत. या सक्तीला सोलापुरातून तीव्र विरोध होण्याची दाट शक्यता आहे.

# आ. मोहिते-पाटील यांनी केला चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपला चांगले यश मिळाले आहे. यामुळे मुंबई येथे जाऊन आ. रणजितसिंह मोहिते- पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार केला आहे. एकीकडे आ. रणजितसिंह मोहिते -पाटील यांना पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी होत असताना दुसरीकडे मोहिते-पाटील यांनी बावनकुळे यांचा सत्कार केला असल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.

माळशिरस विधानसभा मतदार संघात भाजपने आ. राम सातपुते यांना उमेदवारी दिली तर महाविकास आघाडीने उत्तम जानकर यांना उमेदवारी दिली. या निवडणुकीत अटीतटीचा दुरंगी सामना होऊन यात उत्तम जानकर विजयी झाले. यानंतर माजी आ. राम सातपुते यांनी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी मतदार संघात प्रचार केला नाही. विरोधी पक्षाचा प्रचार केला आहे. यामुळे मला पराभवाला सामोरे जावे लागले. यामुळे आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांची पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी राम सातपुते यांनी वरिष्ठ नेत्यांकडे केली. यानंतर भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आ. मोहिते पाटील विषयी तक्रार केली होती. आ. मोहिते पाटील विषयी भाजपमधील नेत्यांकडून तक्रारी होत असल्या तरी शुक्रवारी आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी मुंबई येथे जाऊन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निवडणुकीत चांगले यश मिळाले याबद्दल सत्कार केला आहे. यामुळे आता भाजप आ. मोहिते पाटील विषयी कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

# पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी शासनाचे पथक जिल्ह्यात दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो म्हणून जिल्ह्यातील पाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी शासनाचे पथक दाखल झाले आहे. गेल्या तीन दिवसापासून हे पथक चार तालुक्यातील पाण्याची तपासणी करत आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, अक्कलकोट, करमाळा, उत्तर सोलापूर या चार तालुक्यात हे पथक दाखल झाले आहे. हे पथक विविध ठिकाणी असलेल्या पाण्याचे नमुने घेऊन याची तपासणी करत आहे. पाण्याची तपासणी झाल्यानंतर कोणकोणत्या उपाययोजना करून पाणी शुद्ध करता येईल याबाबतची माहिती प्रशासनाला देणार आहे .

दूषित पाण्यामुळे साथीचे रोग निर्माण होऊन नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. यामुळे नागरिक शुद्ध पाणी पिण्याकडे कल असल्याचे दिसून येत आहे. मात्र नदी, नाले, ओढे, तलाव यातील पाणी दूषित असल्याने याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. यामुळे आता याची दखल शासनाने घेतली असून आरोग्य विभागाच्यावतीने पाणी तपासणीचे खास पथक सोलापूर जिल्ह्यात पाठविण्यात आले आहे. या पथकातील अधिकारी कर्मचारी विविध ठिकाणांमधील पाण्याचे नमुने घेऊन याची तपासणी करत आहे. यानंतर याचा अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करण्यात येणार आहे.

### बालविवाह रोखण्यासाठी ग्रामस्तरावर जनजागृती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर येथे बालविवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत बालविवाह होऊ नये यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करून बलविवाह होऊ न देण्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर ठराव घेण्यात आला. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी बालविवाह कायद्याबाबत ग्रामस्थांमध्ये जागृती केली. या कार्यक्रमात बालविवाह न करण्याची व होऊ न देण्याची ग्रामस्थांनी शपथ घेतली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादीन शेळकंदे आदी अधिकारी उपस्थित होते.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** विधानसभा निवडणुकीत यश मिळाल्याबद्दल भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी मुंबई येथे जाऊन केला.

## पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील नागरिकांची मागणी

# आ. समाधान आवताडे यांनी जनता दरबार घ्यावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिक शेतकरी विद्यार्थी महिला यांना वेगवेगळ्या अडीअडचणीला सामोरे जावे लागते. या अडचणी सोडविण्यासाठी आ. समाधान अवताडे यांनी पंढरपूरात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी जनता दरबार घ्यावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात भाजपने आ.समाधान आवताडे यांना उमेदवारी दिली होती. आ. अवताडे यांनी गेल्या तीन वर्षात मतदार संघात चांगली विकासाची कामे केली असल्याने मतदाराने यंदाच्या निवडणुकीत त्यांना साथ देऊन विजयी केले. पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला यांना विविध कामानिमित्त शासकीय कार्यालयात जावे लागते. तसेच अनेक कामे असतात. ही कामे करण्यास अडचण निर्माण होते. यामुळे या अडचणी सोडविण्यासाठी व नागरिकांना मदत करण्यासाठी आ. समाधान आवताडे यांनी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी जनता दरबार घेऊन नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्या सोडवाव्यात अशी मागणी होत आहे. सोलापूर येथील आ. सुभाष देशमुख गेल्या अनेक वर्षापासून आपल्या मतदार संघातील अडीअडचणी जाणून घेण्यासाठी प्रत्येक महिन्याला जनता दरबार घेतात. यामुळे प्रत्येक निवडणुकीत मतदार त्यांना मतदान करून विजयी करतो. याच धरतीवर आ. समाधान आवताडे यांनी प्रत्येक महिन्याला जनता दरबार घेऊन नागरिकांची कामे करावीत अशी मागणी होत आहे. मतदारांची संपर्क ठेवून अडीअडचणी जाणून घेण्यासाठी आ.समाधान आवताडे यांनी पंढरपुरात संपर्क कार्यालय सुरू केले आहे. मात्र या कार्यालयात गेल्यानंतर नागरिकांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येतात. कामाची दखल घेण्यात येत नाही असा अनुभव अनेक नागरिकांना आलेला आहे. यामुळे नागरिकांनी संपर्क कार्यालयाकडे पाठ फिरविली असल्याचे दिसून येत आहे. कै. आ. भारत नाना भालके हे त्यांच्या संपर्क कार्यालयात दररोज मतदार संघातील नागरिकांना भेट देऊन अडीअडचणी जाणून घेऊन सोडवणूक करत होते. यामुळे भालके तीन वेळा मतदार संघात विजयी झाले. आ. अवताडे यांनी जनता दरबार घेतल्यास मतदार संघातील नागरिकांचा संपर्क होऊन चांगला प्रतिसाद मिळणार आहे. याचा फायदा त्यांना विधानसभा निवडणुकीत होणार आहे.

# सोलापूर शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महिलांनी एकत्रित यावे- आयुक्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहर स्वच्छ व सुंदर करण्या करिता महिलांनी पुढाकार घेऊन आपले घर व आपले परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घ्यावी, तसेच स्वयं सहाय्यता गटातील सर्व महिलांना या अभियानात सामावून घ्यावे असे प्रतिपादन सोलापूर मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सोलापूर मनपा मार्फत आयोजित महिला मेळाव्यात केले. यावेळी मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे, शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी, सर्व समुदाय संघटक, तसेच शहरातील सर्व मुख्य आरोग्य निरीक्षक उपस्थित होते.

आज आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यासाठी सोलापूर शहरातून व परिसरातून मोठ्या प्रमाणाम महिला उपस्थित होत्या. या मेळाव्यात बोलताना आयुक्त रवी पवार यांनी स्वच्छतेचे महत्व पटवून देऊन महिलांना याविषयी योग्य ते मार्गदर्शन करुन स्वच्छता कशी राखावी याचेही मार्गदर्शन केले.


बचत ज्याच्या घरी। लक्ष्मी तेथेच वास करी।।

काळंबादेवी
को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
Reg.No.BOM/WT/RST/CR/1123/1987-88

प्रशासकीय कार्यालय- कराड-ढेबेवाडी मेनरोड, श्रद्धा हॉस्पिटल समोर, तळमावले,जि.सातारा

शाखा : तळमावले,पंढरपूर, मल्हारपेठ, पलुस, घणसोली (नवी मुंबई) दिघंची
पंढरपूर शाखा : स्टेशनरोड, ४००० ब/२, मरवडेकर मॉलसमोर, पंढरपूर संपर्क-८६६८३०३५८०

अनुभवी कामगार पाहिजेत

आमच्या संस्थेत खालील कामगारांची आवश्यकता आहे.

१. क्लार्क २. कॅशिअर ३. शिपाई ४. पिग्मी एजंट

तरी गरजू व होतकरु उमेदवारांनी आपल्या कागदपत्रासह आमच्या शाखेशी संपर्क साधावा. अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

शाखाधिकारी

**मोहोळ** : मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथील भोगावती नदीच्या प्रवाह माफक यंत्रसामुग्रीच्या वस्तूची कुलूप तोडून चोरी केली आहे. ही घटना घडली आहे. यामध्ये डाटा लॉगर, सोलर प्लेट, बॅटरी, सोलार चार्जर, लोखंडी बॉक्स, मशीन असा एकूण १ लाख ८१ हजार ५७५ रुपयाच्या मुद्देमाल चोरीस गेला आहे. अज्ञात इसमानाविरुद्ध मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत फिर्याद कनिष्ठ अभियंता श्रीनाथ काशिनाथ कळमकर यांनी दिली आहे.

## केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत जि.प. प्रा.शाळा

# पाटील वस्ती(फोंडशिरस) शाळेला सर्वसाधारण विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस** : विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकासात मैदानी खेळाचे महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्तीची जोपासना व्हावी, सांघिक भावना वाढीस लागावी, आत्मसात केलेले कौशल्य दाखवण्याची संधी खेळाडूंना मिळावी यासाठी दरवर्षी शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात.

याहीवर्षी समूहसाधन केंद्र फोंडशिरस येथे केंद्रस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा केंद्रीय मुख्याध्यापक संभाजी फुले यांचे मार्गदर्शन व नियोजनात संपन्न झाल्या.
या स्पर्धेत जि. प. प्रा. शाळा, पाटील वस्ती ( फोंडशिरस) यांनी लहान व मोठ्या गटात यशाची परंपरा कायम राखत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे.
लहान गट मुले कबड्डी -अंतिम विजेता,लहान गट मुली कबड्डी -अंतिम विजेता, मोठा गट मुले कबड्डी -अंतिम विजेता,मोठा गट मुली कबड्डी- अंतिम विजेता, लहान गट मुले खो खो -अंतिम विजेता,लहान गट मुली खो खो- अंतिम विजेता, मोठा गट मुले खो खो- अंतिम विजेता,मोठा गट मुली खो खो- अंतिम विजेता,मोठा गट मुले लंगडी- उपविजेता,मोठा गट मुली लंगडी- उपविजेता याप्रमाणे यश संपादन केले आहे.
विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या खेळाडूंना शाळेतील शिक्षक सुनील टेके, बाबुराव जमाले,कुबेर खोत, स्वाती पायमल यांचे मार्गदर्शन लाभले . शाळेच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक कैलास गायकवाड, केंद्र प्रमुख कांतिलाल पोतलकर , गटशिक्षणाधिकारी प्रदीपजी करडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

## आ. अभिजित पाटलांची अधिकाऱ्यांशी चर्चा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा** : माढा विधानसभा मतदारसंघातचे नूतन आ. अभिजित पाटील यांनी मतदारसंघातील माढा तालुक्यातील विविध प्रश्नांबाबत तहसील कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काय करावे लागेल हे जाणून घेतले. तहसील कार्यालयात आ. पाटील यांनी प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर, तहसीलदार विनोद रणवरे, गटविकास अधिकारी महेश सुळे, माढ्याचे मुख्याधिकारी नेहा कंठे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुनील हेळकर या अधिकाऱ्यांशी विविध प्रश्नांची सोडवणूक कशी करता येईल याबाबत चर्चा केली.

## Selected

### आमिषाला बळी पडून शिक्षकाने २४ लाख गमावले



**कुर्डूवाडी** : सोशल मीडियाच्या माध्यमातून आलेल्या लिंकद्वारे ऑनलाईन ट्रेडिंग करून सुरुवातीला मिळालेल्या आमिषाला बळी पडून भुताष्टे (ता. माढा) येथील जि. प. शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्रीनिवास मोहिते यांनी सुमारे २४ लाख रुपये गमावले. याबाबत श्रीनिवास भुजंगराव मोहिते (रा. भोसरे, ता. माढा) यांनी कुर्डूवाडी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.

### तालुक्यातील चारही साखर कारखाने बंदच



**करमाळा** : करमाळा तालुक्यात श्री आजिनाथ, श्री मकाई हे दोन सहकारी साखर कारखाने आहेत. शिवाय तालुक्यात मंत्री प्रा. तानाजी सावंत यांचा भैरवनाथ शुगर (विहाळ) तर माढ्याचे विक्रमसिंह शिंदे चेअरमन असलेला विठ्ठल रिफाइंड शुगर (पांडे) असे चार साखर कारखाने आहेत. तालुक्यात साधारणपणे ३० लाख मे. टन ऊस उपलब्ध आहे. एका बाजूला मोठ्या प्रमाणावर ऊस असताना दुसऱ्या बाजूला चारही साखर कारखाने चालू हंगामात बंद आहेत. त्यामुळे तालुक्याबाहेरील कारखान्यांना ऊस घालण्याची वेळ येथील शेतकऱ्यांवर आली आहे.

## जि. प.शाळा दत्तनगर अकलूज चा कबड्डी मुलींचा मोठा गट प्रथम क्रमांकाने विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा** : 28 /29 नोव्हेंबर 2024 रोजी अकलूज केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दत्तनगर अकलूज या शाळेने घवघवीत यश मिळविले. कबड्डी स्पर्धेमध्ये मोठ्या गटात मुलींच्या संघाने केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला* . तसेच खो-खो स्पर्धेमध्ये हाच संघ उपविजेता ठरला. मोठा गट मुले यांनी देखील खो-खो स्पर्धेत उपविजेतेपद मिळविले.
वैयक्तिक
*स्पर्धा100/200धावणे*
या प्रकारामध्ये मुलांमध्ये चि *.अंशू गुंडेश्वर भोसले* याने प्रथम क्रमांक मिळविला. तर कु *.श्रावणी शंकर दोरकर* हिने मुलींमध्ये तृतीय क्रमांक पटकावला.तसेच लहान गटात चि.*प्रणव विलास भोसले* याने देखील मुलांमध्ये 100 /200 मीटर धावणे या स्पर्धेत *तृतीय* क्रमांक पटकावला.

## आभार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर** : सोलापूर शहर मध्ये विधानसभा मतदार संघाचे नूतन भाजपचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूरचे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांची भेट घेतली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका शहरात त्यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत शांततेत, कायदा सुव्यवस्था अबाधित राखून पार पाडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून आभार मानले. यावेळी त्यांनी सोलापूर शहरातील विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी माजी स्थायी समिती सभापती विनायक कोंड्याल, मेघनाथ येमुल आदी उपस्थित होते.

## हनुमंत पांडुरंग राऊत यांना कृतिशील शिक्षक पुरस्कार जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ** : येथील भैरवनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सहशिक्षक हनुमंत पांडुरंग राऊत यांना महाराष्ट्र राज्य कृती समिती च्या वतीने दिला जाणारा कृतिशील शिक्षक पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. हा पुरस्कार रविवारी दि.१ डिसेंबर रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत समारंभ पूर्वक दिला जाणार आहे.
हनुमंत राऊत यांनी अंकोली येथील भैरवनाथ विद्यालयात राज्यातील पहिली गणित प्रयोगशाळा सुरू केली.
त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेचे बाळकडू या शाळेत रुजवले. एन एम एम एस (आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती), महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती या परीक्षेच्या माध्यमातून या शाळेतील मुलांना एक कोटी रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळत आहे. त्यांना आज पर्यंत रयत शिक्षण संस्थेचा कृतिशील पुरस्कार, मुख्याध्यापक संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, डॉ मार्डिकर पुरस्कार, त्याच बरोबर राज्य नवोपक्रम स्पर्धेत सलग चार वेळा पारितोषिक पटकवले आहे. राज्य गणित प्रशिक्षक म्हणून राज्यभरातील हजारो शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे.
त्यांना हा पुरस्कार मिळाला म्हणून अंकोली शाळेचे प्राचार्य दुर्गादास मोहिते, शाळा समितीचे सदस्य बाबासाहेब क्षीरसागर,सज्जनराव पवार, संग्रामसिंह पवार, माजी सरपंच संदीप पवार , सरपंच पांडुरंग येळवे, विकास शिंदे, माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी अभिनंदन केले.

### मोठ्या भावाची जबाबदारी पार पाडायला हवी होती



**सांगोला** : सांगोला विधानसभा मतदारसंघातील पराभवानंतर दोन मित्रांमध्ये पुन्हा एकदा जुंपली आहे. दीपक साळुंखेंना आपण छोटा भाऊ मानले, त्यांना आमदारकीचे सर्व अधिकार दिले. ते शिवसैनिकाला दिले असते तर मी पुन्हा आमदार झालो असतो, असे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी म्हटले होते. त्याला साळुंखेंनी उत्तर दिले असून 'मोठा भाऊ म्हणून शहाजीबापूंनी एकत्र राहण्याची जबाबदारी घ्यायला पाहिजे होती', असेही त्यांनी म्हटले आहे.




## कदम आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी** : महावीर कदम हे 1 डिसेंबर 2024 रोजी ऑस्ट्रेलियाच्या बॅसल्टन शहरात होणाऱ्या प्रतिष्ठित "फुल आयर्न मॅन" आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ऐतिहासिक सहभागामुळे बार्शी शहराचे नाव जागतिक स्तरावर गाजणार आहे. "फुल आयर्न मॅन" स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना एकूण 226 किलोमीटरचे अंतर 17 तासांच्या आत पार करावे लागते. या अत्यंत कठीण स्पर्धेत 4 किलोमीटर समुद्रात पोहणे, 180 किलोमीटर सायकल चालवणे आणि 42 किलोमीटर धावणे आवश्यक असते. स्पर्धकांची शारीरिक आणि मानसिक तयारी अत्यंत महत्त्वाची असते.

## मृत व्यक्ती उपस्थित दाखवत केली जमिनीची मोजणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : सात-बारा उताऱ्यावर नावे असलेल्या व्यक्तींना न बोलावताच जागेची परस्पर मोजणी केल्याप्रकरणी भूमिअभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक नितीन सावंत आणि कार्यालयातील अन्य तिघांविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विशेष म्हणजे मोजणीवेळी उपस्थित असणाऱ्या व्यक्तीचे काही महिन्यापूर्वीच निधन झाले आहे. पण ते उपस्थित असल्याचे दाखवण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु असल्याचे सांगण्यात आले. याबाबत लवकरच तपास करुन आरोपींना अटक केली जाईल.

### मोहिते पाटलांची भाजपमधून हकालपट्टी होणार



**माळशिरस** : विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या विरोधात काम करणारे विधान परिषद सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी, अशी शिफारस जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे, त्यांची भाजपतून लवकरच हकालपट्टी होईल, अशी माहिती भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांनी दिली.




## शेतकऱ्यांना शासनाकडून हमीभावाने मका खरेदीची प्रतीक्षा

# सांगोला बाजारात दररोज मोठ्या प्रमाणात मक्याची आवक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला** : मक्याच्या भावात मागील काही दिवसापासून वाढ होताना दिसत आहे. बाजारात गेल्या दीड महिन्यापासून यंदाच्या हंगामातील धान्य विक्रीसाठी दाखल होत आहे. मक्याची सर्वाधिक आवक होत आहे. सद्यस्थितीत मक्याला १७०० ते 2100 रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळत आहे. शेतकऱ्यांना शासनाकडून हमीभावाने मका खरेदीची प्रतीक्षा आहे.

सांगोला तालुक्यात २७ हजार ६०५ हेक्टर क्षेत्रावर खरिप पेरणीचे नियोजन केले होते. यामध्ये सर्वाधिक क्षेत्रावर मक्याची लागवड झाली. पर्जन्यमानाची स्थिती मका पिकासाठी चांगली झाली असल्याने मक्याचे पीक चांगलेच बहरले. आणि तालुक्यात मका उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नवीन मका बाजारात येत असल्यामुळे मध्यंतरी मक्याचे दर पूर्ण पडले होते. यामुळे शेतकऱ्यांनी मका विक्रीसाठी बाजारात आणली नव्हती. परंतु आता मक्याचे दर हळूहळू स्वरूपाने वाढत असल्यामुळे पुन्हा बाजारात नवीन मका विक्रीसाठी येत आहे. यामुळे मागील दीड महिन्यांपासून बाजार पेठेत दरदिवशी मक्याची चांगली आवक होत आहे. परिणामी मक्याला १७०० ते २२१० रुपये प्रतिक्विंटल असे भाव मिळाले. गत वर्षापेक्षा यंदा भाव अधिक आहे. या भावांमध्ये येत्या काही दिवसात वाढ होऊ शकते, अशी शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

शेती आणि शेतीपूरक उद्योग म्हणून शेत पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात तालुक्यात सुरू आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी बाजरी पिकाऐवजी मका पिकावर अधिक भर दिला आहे. यातून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागला असून त्याचबरोबर मका या पिकातून आर्थिक उत्पन्न देखील मिळत असल्याने बहुतांश क्षेत्रावर मका लागवड झाली. आज सदर मका विक्रीसाठी बाजारात येत असताना चांगला दर मिळत नसल्याची भावना येथील शेतकरी वर्तवीत आहेत. शासनाने हमीभाव द्यावा अशी मागणी या निमित्ताने जोर धरत आहे.

**सोलापूर :** कृषी आयुक्त यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत अनुसुचित जाती अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांकरीता निधी उपलब्ध असल्याने ठिबक सिंचन , तुषार सिंचन बाबींकरीता अर्ज मागविण्यासाठी 30 नोव्हेंबर ते 14 डिसेंबर 2024 कालावधित विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तरी अनु. जाती व जमाती शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या ८ विद्यार्थ्यांची

# 'एव्हर्टोजेन फार्मा प्रा. लि.'मध्ये कॅम्पस इंटव्हूवद्वारे निवड

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर- :** 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टीट्यूट संचलीत कॉलेज ऑफ फार्मसी तथा बी. फार्मसी महाविद्यालयातील ०८ विद्यार्थ्यांची हैदराबाद येथील 'एव्हर्टोजेन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड' या औषध निर्मिती क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीत कॅम्पस इंटरव्यूव्हमधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली.

हैदराबाद येथील 'एव्हर्टोजेन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीचे व्यवस्थापक राजेश किणगे, एच.आर. नवीनकुमार जोगी व त्यांच्या निवड समितीने स्वेरीच्या स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात दि.१५ नोव्हेंबर २०२४ रोजी येऊन घेतलेल्या इंटरव्यूव्हमधून डी. फार्मसी व बी. फार्मसी च्या एकूण ०८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. गुणात्मक अभ्यासाबरोबरच कमालीची शिस्त, आदरयुक्त संस्कृती व उत्कृष्ठ शिक्षण पध्दती यामुळे निवड समिती अत्यंत प्रभावीत झाली. निवड समितीच्या अंतिम प्रकियेतून फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणारे प्रतिक शिवराज खराडे, मिनाज रफिक तांबोळी, दिव्या महादेव बोराडे, प्राची सुकुमार अवचर, सुश्मिता चंद्रकांत कांबळे, प्रतिका राजेंद्र सुरवसे, सुशांत शंकर मुसमुसे आणि ऋतुजा उमेश पंके या ०८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाला आलेल्या भरघोस यशानंतर पालकांच्या मागणीनुसार २००६ साली फार्मसी महाविद्यालयाची स्थापना झाली. अभियांत्रिकीच्या पाऊलांवर पाऊल ठेवून फार्मसी मध्ये देखील यशस्वी वाटचाल सुरु आहे. प्रत्येक वर्षी वार्षिक परीक्षेमध्ये उत्कृष्ठ निकाल, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट होण्याच्या संख्येत लक्षणीय वाढ आदी बाबी विद्यार्थ्यांच्या करिअरला पोषक अशा आहेत. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी सांगितले की, 'आमचा विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्ह आयोजित करण्याचा उद्देश, त्यांना उत्तम करिअर संधी उपलब्ध करून देणे आहे. 'एव्हर्टोजन' फार्मासारख्या प्रतिष्ठित कंपनीने आमच्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाव्यात यासाठी आमच्या विनंतीचा स्वीकार करून कॅम्पस ड्राईव्ह घेण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळाला.' या कॅम्पस ड्राईव्ह मधील यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. मिथुन मणियार व फार्मसीचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट इन्चार्ज प्रा. कोमल परचंडे व टी.पी.ओ. समन्वयक प्रा. प्रदीप जाधव यांच्या नेतृत्वाखाली इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्लेसमेंटमध्ये देखील यश मिळत आहे. यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच पालकांमध्येही आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे, अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी व पालकांनी कंपनीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## करमाळ्यात शिंदे गट सक्रिय होणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** विधानसभा निवडणुकीत संजयमामा शिंदे यांचा १६ हजार मताने पराभव झाला. येथील निवडणूक घासून होईल असे अंदाज होते हजार- दोन हजार मताच्या फरकाने कोणाचाही विजयी होईल, असा राजकीय जाणकारांचा अंदाज होता. मात्र सर्वांचे हे अंदाज खोटे ठरले. शिंदे यांनी तालुक्यात विकास केला त्याच जोरावर त्यांना ८० हजार मतं मिळाली. त्यांच्या पराभवाची कारणं वेगळी आहेत. आणि निकालानंतर शिंदे गटाबद्दलच राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या आहेत. पण करमाळ्यात शिंदे गट सक्रिय होणार आणि पुन्हा भरारी घेणार असेही बोलले जात आहे.

» पान १ वरुन

## 'ईव्हीएम' बाबत शरद पवार यांनाही ....

सत्तेचा गैरवापर आणि पैशांचा महापूर याआधी कधीही पाहायला मिळाला नव्हता. स्थानिक निवडणुकांत अशा घटना ऐकायला मिळतात; पण राज्याच्या निवडणुकात असे चित्र कधी पाहायला मिळाले नव्हते. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. 'ईव्हीएम'मध्ये गडबड असल्याचा आरोप केला जात आहे. याबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "काही लोकांनी 'ईव्हीएम' कसे सेट केले जाते, याचे आम्हाला प्रेझेंटेशन दिले होते. आमची कमतरता होती की, आम्ही त्यावर विश्वास ठेवला नाही; पण आता निवडणुकीत इतके काही टोकाचे होईल, असे कधी वाटले नव्हते. आम्ही यापूर्वी कधी निवडणूक आयोग या संस्थेवर संशय व्यक्त केला नाही; पण निकालानंतर आता तथ्य दिसत आहे. राज्यातील २२ उमेदवारांनी फेरमतमोजणी करण्यासाठी अर्ज केला आहे. यातून काही साध्य होईल का? याबाबत मला शंका वाटते."

"निवडणुकीत झालेल्या गैरव्यवहाराच्या विरोधात आवाज उचलण्यासाठी लोकांमध्ये पुन्हा जावे लागेल. लोक जागृत आहेतच, त्यांना उठावासाठी तयार करावे लागेल. बाबा आढाव यांच्या आंदोलनाचा परिणाम आज ना उद्या झाल्याशिवाय राहणार नाही." असे सांगून ते म्हणाले, की आढाव यांच्या उपोषणाने एकप्रकारचा दिलासा सामान्य माणसांना मिळत आहे. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून त्यांनी ही भूमिका घेतली; पण त्यांनी एकट्यानेच भूमिका घेणे पुरेसे नाही. जनतेचाही यासाठी उठाव व्हायला हवा, अन्यथा संसदीय लोकशाही उध्वस्त होईल.

» Selected

## देवेंद्र फडणवीस यांनी माझे पालकत्व स्वीकारले



**सोलापूर :** माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझे पालकत्व स्वीकारले आणि आज खऱ्या अर्थाने माझे आजोबा तात्या कोठे यांचे स्वप्न पूर्ण झाले असल्याची प्रतिक्रिया सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली. आमदार देवेंद्र कोठे यांचा मित्र परिवाराच्या वतीने मेकॅनिक चौक येथील संपर्क कार्यालयात पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी सुहास कोलारकर, वैभव गंगणे, अमृत भुरळे, मोहन माळी, नवनाथ कोलारकर, पिंटू रणदिवे यांची उपस्थिती होती.

# पालखी प्रस्थानाने खर्डी भंडाऱ्याची सांगता



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** जिल्हा ग्रामीण तीर्थक्षेत्र असणाऱ्या श्री सीताराम महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता अमावस्येला झाली.यात्रेवेळी जवळपास दोन लाख भाविकांनी समाधीचे दर्शन घेतले.कोल्हापूर सांगली कर्नाटक सोलापूर जिल्ह्यातील भाविकांनी उपस्थिती लावली.बाहेर गावाहून पै पाहुणे,लेकी जावई, मुलांबाळसह गाव फुलून गेला होता.खेळणी घरगूती वापरांच्या वस्तूंची मोठी उलाढाल झाली.दुपारी 12:30 वा समाधी वर पुष्पवर्षाव करण्यात आला.पंचकट्यावर शिधा जमा करण्यात आला.यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.पांडुरंग परिवाराचे प्रमुख प्रशांत परिचारक,पंढरपूर मंगळवेढा मतदार आमदार समाधान अवताडे,शहर विकास आघाडीचे प्रमुख उमेश परिचारक, युवा नेते प्रणव परिचारक शिवाजी रोंगे सरपंच मनीषा सव्वाशे, उपसरपंच शरद रोंगे आदींसह अनेक राजकीय व्यक्तींनी दर्शन घेतले. श्रींची पालखी गावातून शोभेच्या दारूकामाने नगरप्रदक्षिणा करून गाणगापूर प्रस्थान ठेवले. यावेळी मुख्य विस्वस्त हरिभाऊ कुलकर्णी,अध्यक्ष दीपक रोंगे,बापू केसकर, पालखी सोहळा प्रमुख विकास कुलकर्णी लक्ष्मण रोंगे,अशोक पाटील,दत्ता पाटील,दत्ता यादव,अभिजित आबा रोंगे,हणमंत केसकर,चैतन्य केसकर,बाळू मोकाशी,किरण मोकाशी, उपस्थित होते.सांगोला पंढरपूर येथून विशेष यात्रा बसची सोय करण्यात आली होती.समस्त ग्रामस्थांच्या वतीने यात्रा सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. पालखी मंगळवेढा, अक्कलकोट मार्गे गाणगापूर जाणार आहे.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** मोहोळ तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार राजाभाऊ खरे यांचे तक्षशिला हौसिंग सोसायटी व पंचशील मंडळ मोहोळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. गोपाळपूर येथील त्यांचे घरी आमदार राजाभाऊ खरे यांचे शाल श्रीफळ व पुष्पहार घालून रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्राचे सरचिटणीस जितेंद्र बनसोडे तर पंचशील मंडळाचे वतीने कुमार ढवळे, कारंडे गुरुजी, शशिकांत ठोकळे , राजेंद्र फडतरे, दिपक आठवले, खांडेकर गुरुजी, रोडे साहेब यांनी अभिनंदन केले. या प्रसंगी संजय शिवशरण,राहुल चंदनशिवे, अनिल शिवशरण,समाधान बाबर, विजय खरे, ऋषीकेश भालेराव, अॅड. गौतम भालेराव यांचेसह कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.


# पाहिजे

**हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी**
**शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास**
**पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल**
**लिंक रोड,पंढरपूर**
**फोन नंबर :- ८२९१३१५०८९**


## मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी निवेदन

**माळशिरस :** माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी या गावाने आता चाचणी मतदान घेण्यासाठीची थेट मागणी तहसीलदारांकडे केली आहे. मारकडवाडी गाव हे कायम उत्तम जानकर यांना मताधिक्य देणारे आहे. मात्र या गावात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या राम सातपुते यांना मताधिक्य मिळाले. त्यामुळे ईव्हीएम बाबत शंका घेऊन मारकडवाडी ग्रामस्थांनी मतपत्रिकेवर थेट चाचणी मतदान घेण्याचा ठराव केला आहे. यासाठी येत्या तीन जानेवारीला बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया राबवण्यासाठी शासकीय कर्मचारी मिळावेत अशी थेट मागणी शासनाकडे केली आहे.


**लवाद अधिकारी अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज अॅक्ट २००२ आणि आर्बिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये )
जा. क्रं. 5022 दि. 29/11/2024
रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ३३०३/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-खरबडे सिद्धांत कुमार** रा.बोरले नाका,भीमनगर, मंगळवेढा ता.मंगळवेढा, जिल्हा सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती - लोखंडे संदेश नागेश** रा मु. ता. मंगळवेढा, जि. सोलापूर **श्री/श्रीमती - लोकरे आकाश शंकर** रा भीमनगर, मंगळवेढा ता.मंगळवेढा, जि.सोलापूर |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ०७/१२/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का
सही/-
**अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**



**लवाद अधिकारी अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज अॅक्ट २००२ आणि आर्बिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये )
जा. क्रं. 5022 दि. 29/11/2024
रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| २४८६/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-हेंबाडे दीपक शिवाजी** रा.शेंबाडे शिवाजी, नागणे गल्ली मंगळवेढा ता.मंगळवेढा, जिल्हा सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती - शेजाळ सुनील बाबासो** रा.s/o बाबासो शेजाळ ढवसळ सिद्धवाडी ता.मंगळवेढा, जि.सोलापूर **श्री/श्रीमती - चव्हाण भगवान स्वामीराव** रा.s/oस्वामीराव ज्ञानबा चव्हाण माली वस्ती, जुना मारापूर रोड,शांतीनगर संत चोखामेळानगर ता.मंगळवेढा, जि.सोलापूर |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ०७/१२/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का
सही/-
**अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**



**लवाद अधिकारी अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज अॅक्ट २००२ आणि आर्बिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये )
जा. क्रं. 5022 दि. 29/11/2024
रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| २४८५/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-आदमाने शेखर दादासाहेब** रा.शनिवार पेठ, मंगळवेढा, ता.मंगळवेढा जिल्हा सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती - बुरकुल संगमेश्वर गुरुपाद** रा.s/o गुरुपाद बुरकुल शनिवार पेठ मंगळवेढा ता.मंगळवेढा, जि.सोलापूर **श्री/श्रीमती - घाटनाटे इरबसय्या सिद्राम** रा.s/o सिद्राम घाटनाटे शनिवार पेठ, मंगळवेढा ता.मंगळवेढा, जि.सोलापूर |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ०७/१२/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का
सही/-
**अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**


## सुरु असलेले काम अतिशय संथगतीने

# पंढरपूर येथील चार्जिंग स्टेशन लवकर सुरू करावे- ग्राहक पंचायतीची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्य परिवहन महामंडळाच्या पंढरपूर येथील चार्जिंग स्टेशनचे काम लवकर पुर्ण करून ते सुरु करावे अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने विभाग नियंत्रकाकडे पत्राद्वारे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळाच्या येथील चार्जिंग स्टेशनचे काम अतिशय संथगतीने सुरू असल्याने येथून इलेक्ट्रीक बस धावु शकत नाहीत. आषाढी यात्रेत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ होणार असेही सांगितले जात होते. ते न होता मागील आठ महिन्यांपासून हे काम सुरू आहे तथापि अद्यापही ते पूर्ण झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. सोलापूर जिल्ह्यात सोलापूरशिवाय पंढरपूर आणि मंगळवेढा या दोनच आगारात चार्जिंग स्टेशनची उभारणी चालू आहे.मात्र दोन्ही ठिकाणची कामे पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे सोलापूर ते पुणे या मार्गावरच इलेक्ट्रीक बस धावत आहेत. जिल्हयातील इतर दोन्ही ठिकाणची कामे पुर्ण न झाल्याने देशातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूर येथील आगार व भाविक इलेक्ट्रीक बस सेवेपासून वंचित आहेत. त्यामुळे चार्जिंग स्टेशनची उभारणी गतीने पुर्ण करुन त्याची चाचणी लवकरच घेऊन प्रवासी भाविकांना इलेक्ट्रीक बस सेवा उपलब्ध होईल अशी अपेक्षा ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख,जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते,तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, संघटक महेश भोसले,सदस्य अण्णा ऐतवाडकर, सागर शिंदे यांनी व्यक्त केली आहे.



## बार्शी शहराच्या मताधिक्यावर सोपवलं यांचा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी विधानसभा मतदारसंघातील १३२ पैकी ७९ गावात शिवसेना शिंदे पक्षाचे राजेंद्र राऊत यांना मताधिक्य मिळाले तर शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे दिलीप सोपल यांना ५५ गावात मताधिक्य मिळाले. सोपल यांना बार्शी शहर आणि वैराग शहराने मताधिक्य दिले. वैराग भागानेही दिलीप सोपल यांना साथ दिली. तर राजेंद्र राऊत यांना उत्तर बार्शी भाग सोबत राहिला. मागील वेळी १० हजाराने मायनस असलेला ग्रामीण भाग यंदा जवळपास बरोबरीत आल्याने दिलीप सोपल हे ६४७२ मताने विजयी झाले आहेत. शहरातील जनता सोपल यांच्यावर नाराज असल्याचे मतदानावरुन दिसून आले.


**लवाद अधिकारी अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज अॅक्ट २००२ आणि आर्बिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये )
जा. क्रं. 5010 दि. 29/11/2024
रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ४००७/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-बोबडे प्रतिक पांडुरंग** रा. तिन्हे मार्गे, घाडगेवस्ती देगाव, ता.पंढरपूर जिल्हा सोलापूर **जामीनदार श्री/श्रीमती - जगताप भाऊसाहेब सोन्याबापू** रा.मु.पाथर्डी कासार पिंपळगांव, अहमदनगर, ता. पाथर्डी जि.अहमदनगर **श्री/श्रीमती - शेख सैफअली नूर अहमद** रा. देगाव ता.पंढरपूर, जि.सोलापूर |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ०७/१२/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का
सही/-
**अॅड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**

SUNDAY EDGE
पंढरी संचार | pandharisanchar.com 01•DEC•2024

**२०१४ च्या निवडणुकांपर्यंत महाराष्ट्रात काँग्रेसचाच वरचष्मा राहिला आहे. हे चित्र पहिल्यांदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झालेल्या भारतीय जनता पक्षाने बदलले. याचबरोबर महाराष्ट्राच्या राजकारणातही, राष्ट्रीय स्तरावर झाल्याप्रमाणे एक नवीन अध्याय सुरु झाला. त्यानंतर झालेल्या सलग तीन निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने तीन आकडी आमदार विधान- सभेत निवडून आणलेत. १९९० नंतर कुठल्याही एका पक्षाला महाराष्ट्रात ही किमया करता आली नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टी ही महाराष्ट्रातील राजकारणाचा आता मध्यवर्ती खांब म्हणून दृढ झाली. अशाप्रकारे भारतीय जनता पक्ष आता फक्त उजव्या विचारसरणीचा पक्ष न राहता मध्यममार्गी पक्ष म्हणून उदयास आला.**



# ‘देवेंद्र पर्वाचा पुनरोदय आणि शरद पर्वाचा अस्त’





## महाराष्ट्राच्या निवडणुकीचा अन्वयार्थ



राजकीय
प्रितीश पंडित
राजकीय विश्लेषक आणि पत्रकार
पंढरी संचार

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून, आजपर्यंतच्या सर्वच निवडणुकांमध्ये, या निवडणुकीचे महत्व आलेल्या निकालामुळे, वेगळेपणाने अधोरेखित होते. त्यासाठी काही गोष्टी विशेषत्वाने नमूद कराव्या लागतील. महाराष्ट्राच्या आजपर्यंतच्या राजकारणाचा आणि बरोबरीने समाजकारणाचा विचार करताना काही गोष्टी ठळकपणे लक्षात येतात. एकतर असे आहे की महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून साधारणपणे सुरुवातीची पाच दशके महाराष्ट्रावर काँग्रेसचे एकछत्री राज्य होते. अपवाद होता फक्त १९७८ पासून च्या दीड -पावणेदोन वर्षांचा. तेंव्हा काँग्रेसमधून फुटुन पुलोद ची स्थापना करणारे शरद पवार राज्याचे मुखामंत्री झाले. त्यानंतर फक्त १९९५ पासून, पुढील साडेचार वर्षे, प्रथमतः काँग्रेसेतर सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. हा अपवाद वगळता २०१४ च्या निवडणुकांपर्यंत महाराष्ट्रात काँग्रेसचाच वरचष्मा राहिला आहे. हे चित्र पहिल्यांदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झालेल्या भारतीय जनता पक्षाने बदलले. याचबरोबर महाराष्ट्राच्या राजकारणातही, राष्ट्रीय स्तरावर झाल्याप्रमाणे एक नवीन अध्याय सुरु झाला. त्यानंतर झालेल्या सलग तीन निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने तीन आकडी आमदार विधान- सभेत निवडुन आणलेत. १९९० नंतर कुठल्याही एका पक्षाला महाराष्ट्रात ही किमया करता आली नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टी ही महाराष्ट्रातील राजकारणाचा आता मध्यवर्ती खांब म्हणून दृढ झाली. अशाप्रकार भारतीय जनता पक्ष आता फक्त उजव्या विचारसरणीचा पक्ष न राहता मध्यममार्गी पक्ष म्हणून उदयास आला. शेतकरी संघटनेतुन आलेले सदाभाऊ खोत, ओबीसी चळवळीतुन आलेले गोपीचंद पडळकर यांचे बरोबर प्रविण दरेकर, प्रसाद लाड, श्रीमती चित्रा वाघ यांच्यासारखे नेते, भाजपचे नेते मंडळी झाल्याने ही बाब प्रकर्षाने मांडता येते.

या मुद्द्यांचे प्रत्यंतर नुकत्याच सर्वदूर झालेल्या भाजपच्या विजयाने, विस्ताराने आणि आलेल्या आमदारांच्या संख्येने येते. एका अर्थाने २०२४ची विधानसभा निवडणूक ही भाजपचे महत्व आणि स्थान महाराष्ट्राच्या राजकारणात स्थिरस्थावर करणारी ठरली. म्हणूनच भाजपने या निवडणूकीत काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) या परंपरागत प्रति- स्पर्ध्यांबरोबरच आता नवीन विरोधक उबाठा शिवसेनेचा धुव्वा उडवतानाच, अचलपूरात प्रहारचे बच्चु कडू आणि वसई-विरार या पट्यात हितेंद्र ठाकूर यांच्या पक्षालाही धूळ चारली.

निवडणूकीचा दुसरा अन्वयार्थ

या निवडणूकीने महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास नव्या दमाने सुरु होईल.'महाराष्ट्र हे राज्य ट्रिलियन डॉलर इकोनॉमीचे राज्य होईल'ही देवेंद्र फडणवीस यांची घोषणा आहेच, याकडे गांभीर्याने आणि दमदारपणे वाटचाल सुरु होईल. यामूळे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नेते आहेतच, पण ही बाब परत एकदा ठळकपणे आणि प्रकर्षाने पुढे आली आहे. या निवडणुकीने त्यांना लोकमान्यता आणि राज्यमान्यता दोन्हीही मिळाल्यात. राष्ट्रीय राजकारणातही देवेंद्र फडणवीस यांचे महत्व वाढून त्यांना अधिक महत्त्वाचे, तसेच आदराचे स्थान प्राप्त होईल. या निवडणूकीचा दुसरा अन्वयार्थ असा काढता येईल की महाराष्ट्राचे मातब्बर, मुरब्बी अशी ओळख असणारे ज्येष्ठ नेते,'मराठा स्ट्रॉंग मॅन'शरद पवार यांच्या राजकारणाला आता घरघर लागली आहे. दोनशे अठ्ठ्यांशी सदस्यसंख्या असलेल्या विधानसभेत, गेली सहा-सात दशके, महाराष्ट्र आणि देशपातळीवर राजकारण करणाऱ्या नेत्यास साधी सन्मानजनक सदस्यसंख्या पण निवडुन आणता आली नाही. त्यांचे फक्त दहा आमदार निवडून आलेत. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांना युतीतुन फोडून मुख्यमंत्री करण्याची खेळी खेळणाऱ्या आणि त्यानंतरची अडीच वर्षे सत्ता राबवणाऱ्या पवारांसाठी ही मोठी नामुष्कीची बाब आहे. आतातर त्यांच्या घरातच उभी फूट पडली आहे. एवढी वर्षे अकलूजचे मोहित पाटील घराणे, बीडचे बदामराव पंडित घराणे आणि मुंडे काका-पुतणे यांच्यामध्ये आपापसात वाद पेटवणारे शरद पवार आता आपल्याच पुतण्याच्या अंतर्बाह्य विरोधाने अक्षरशः हबकले आहेत. त्यांचे निष्ठावंत राहिलेले दिलीप वळसे पाटील, सुनील तटकरे याचबरोबर छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल सारखे लोक त्यांना सोडून गेल्यावर ते कमालीचे विचलित झाले आहेत. एका अनुभवी आणि पॉवरफुल राजकारण्याची आयुष्याच्या उतार वयात अशी स्थिती होणे हे निश्चितच दयनीय आहे.

या निवडणुकीचा आणखीन एक महत्त्वाचा अन्वयार्थ असा आहे की बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर शिवसेनेचे सर्वेसर्वा असणारे उद्धव ठाकरे यांचा आणि त्यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या शिवसेनेचा १९९० पासून आजपर्यंत सुरू असलेला उर्ध्व प्रवास, आता थोडा निम्न स्तरावर उतरला आहे. मोठ्या विश्वासाने बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना पक्षाची धुरा उद्धव ठाकरे यांच्याकडे सोपवली होती. त्या विश्वासाला अपात्र ठरण्याची कृती उद्धव ठाकरे यांच्याकडून मागील १० वर्षात वारंवार झालेली आहे. यामुळे आज त्यांची आमदार संख्या २० या निचांकी पातळीवर आल्याचे बघायला मिळते.

अगदी सुरुवातीला जेव्हा १९९० मध्ये शिवसेना आणि भाजप युती झाली होती. त्यावेळेस शिवसेनेला १७१ आणि भाजपला ११७ जागा, २८८ सदस्य संख्या असलेल्या विधानसभेत लढायला मिळाल्या होत्या. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास आज तेहतीस वर्षांनी निचांकी पातळीवर पोहोचला आहे. हे निश्चितच त्यांच्या चुकीच्या राजकारणाचे द्योतक आहे. एकेकाळी मनोहर जोशी, वामनराव महाडिक, प्रमोद नवलकर, दिवाकर रावते,सुधीर जोशी यांसारखे दिग्गज शिवसेनेच्या राजकारणात वावरायचे त्याऐवजी आता विविध आरोप असणारे नेते त्यांच्या अवती भवती असतात हेच त्यांच्या अधोगतीचे कारण असू शकते. या निवडणुकीच्या निकालांतुन आणखीन एक गोष्ट अधोरेखित झाली, ती म्हणजे महाराष्ट्रात पहिल्यांदा एक'हिंदू वोट बँक'तयार झाली त्यामुळे शहरी, निमशहरी, ग्रामीण याच बरोबरीने आदिवासी आणि आरक्षित अशा सर्वच मतदारसंघांमध्ये भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांना विजय मिळवता आला. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील दहाच्या दहा जागा महायुतीने जिंकल्या ही बाब दिशादर्शक ठरते.

### भाजप आणि मित्र पक्षांचे लक्षणीय यश

● भाजपाच्या बरोबरीने महायुतीतील घटक पक्षांनाही म्हणजे शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीलाही घवघवीत यश मिळाले, ही हिंदू वोट बँक आणि एकगठ्ठा मतदान झाल्याची पावतीच आहे. या निवडणुकीत भाजपा आणि मित्र पक्षांनी घवघवीत यश मिळवून महाराष्ट्राच्या भूमीत ठामपणे पाय रोवण्याचा घटनेला आणखीन एक आयाम आहे. या भूमीला लोकमान्य टिळकांचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा, तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा मिळालेला आहे. क्रांतिकारकांचे अध्वर्यू आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, यासारखे क्रांतिकारकांचाही वारसा मिळाला आहे. त्याचप्रमाणे हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यारे छत्रपती शिवाजी महाराजांचा देखील वारसा मिळालेला आहे. अटकेपार झेंडे रोवणाऱ्या पेशव्यांचाही वारसा या भूमीला मिळाला आहे, त्यामुळेच महाराष्ट्राच्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्र पक्षांनी मिळवलेले लक्षणीय यश खूप मोठे आहे आणि त्याचा आयाम त्यापेक्षा ही मोठा आहे.

---

**हवामान बदल आणि त्यामुळे होणारे परिणाम याची जागतिक स्तरावर गेल्या ३० ते ४० वर्षांपासून चर्चा होते आहे. हा प्रश्न वैश्विक असला तरी त्याचे उत्तर स्थानिक स्तरावर निश्चित करणे आवश्यक ठरते. तथापि, जागतिक स्तरावर सदस्य राष्ट्रांनी एकत्र येऊन त्यावर चर्चा करणे, आव्हानांची तीव्रता, त्याचे होणारे परिणाम, त्याचे गांभीर्य यांचा विचार करून सर्व सदस्य राष्ट्रांनी एकत्रितपणे आपापल्या देशाच्या ध्येय धोरणांमध्ये अनुकूल बदल करून हवामान बदलाच्या संकटाशी सामना करणे आणि त्याच्याशी जुळवून घेणे हे क्रमप्राप्त ठरते. हवामान बदलाचे परिणाम आणि तीव्रता गेल्या काही वर्षांमध्ये वाढत आहेत. त्याचे परिणाम तापमानातील प्रचंड वाढ तसेच हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा या तीनही ऋतूंची वाढलेली तीव्रता या स्वरूपात भासते. त्यासाठी हवामान बदलावर विचारमंथन करणारी COP29 (Conference of Parties) to the UNFCC ही climate change वरील युनायटेड नेशन्स च्या सभासद देशांची दरवर्षी होणारी परिषद. त्यात २०५० पर्यंत जागतिक तापमान १.५ डिग्री सेल्सिअसने कमी करण्याचे प्रयोजन आहे, तसेच कमीतकमीकार्बन उत्सर्जन आणि fossil fuel वरचे अवलंबित्व कमी करण्याचे योजले आहे. या परिषदेच्या माध्यमातून वातावरणातील बदलांबाबत ऊहापोह होणार आहे.**

# बदलत्या ऋतुचक्राचा दुष्परिणाम



## पुण्यातील तापमानातील बदल आणि थंडीचा कडाका



ग्लोबल वॉर्मिंग
सारिका महाले रोजेकर
पंढरी संचार

हवामानात दिसून येणारे बदल हे जलवायू परिवर्तनाचाच भाग आहेत व प्रचंड चिंतेचे कारण आहेत. कधी प्रचंड पाऊस तर कधी काहीच नाही, उन्हाळाही वाढताना दिसतो. आधुनिक जीवनशैलीमुळे प्रचंड प्रमाणात होणारे कॉर्बन उत्सर्जन आणि वृक्षतोड यामुळे हवामानाचे चक्र अनियमित झाले आहे. फुलांच्या उमलण्याचा कालावधी बदलत आहे तर पक्ष्यांच्या प्रजनन व स्थलांतरावर याचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. एकीकडे भूजलस्तर घटत चालले आहे व दुसरीकडे समुद्राच्या पाण्याचा स्तर वाढत चालला आहे. २०५० पर्यंत अनेक शहर व देश पाण्यात जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आताच जागे झाले नाही तर याचे भयानक परिणाम भविष्यात भोगावे लागणार आहे.

सध्या राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे. पुणे शहरामध्ये देखील कडाक्याची थंडी पडत असून, किमान तापमान ८ अंशावर पोचले आहे. थंडीची लाट येणार असल्याने हा पारा अजून खाली घसरू शकतो. उत्तरेतील वारे वाढल्याने राज्यातील वातावरणात गेल्या दोन, तीन दिवसांपासून मोठा बदल झाला आहे. पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात फेंगल हे चक्रीवादळ निर्माण झाले आहे. यामुळे महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढत राहणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. यामुळे पुणेकरांना एका नव्या हवामानाला सामोरे जावे लागत आहे. या थंडीमुळे आजारांचे प्रमाण देखील वाढत आहे. दिवाळीमध्ये अजिबात थंडी जाणवली नाही. त्यावेळी थंडी कधी पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. पण आता गेल्या आठवड्यापासून पुण्यात थंडीचा कडाका वाढू लागला आहे. या सगळ्याचा परिणाम मानवी आरोग्यावर होताना दिसून येत आहे. हिवाळ्यातील हवा थंड आणि कोरडी असल्याने नागरिकांची प्रतिकारशक्ती देखील कमकुवत होत आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या बदलामुळे थंडी वाढणार आहे. थंडीचे ऋतुचक्र बदलत जात असल्याचा अनुभव येत आहे.

### ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम ..

हवामानातला लहरीपणा दिवसेंदिवस वाढतो आहे. ऋतुचक्रानुसार जून महिन्यात पावसाळा सुरू होतो आणि सप्टेंबरमध्ये तो संपुष्टात येतो. पण, गेल्या काही वर्षांपासून जून महिन्यात अपेक्षेनुरूप पाऊस येतच नाही. जुलैपासून त्याची सुरुवात होते. यंदाही तेच झाले. हिवाळा आणि उन्हाळ्याचे आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हा बदल होत असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

वातावरणातले उष्णतामान दिवसेंदिवस वाढत आहे. क्लायमेट चेंज -ग्लोबल वार्मिंग मानवासह प्राणी, पशू व पक्ष्यांच्या जीवनावरही त्याचे परिणाम वेगवेगळे रोग व आजारांच्या माध्यमातून दिसायला लागले आहेत. वातावरणातील या बदलावर नियंत्रण मिळविण्यासाठी जागतिक पातळीवर सातत्याने मंथन होत आहे. काही उपाय सुचविण्यात आले. परंतु, त्या उपाययोजनांची अंमलबजावणी तेवढे सोपे काम नाही. क्लायमेट चेंज -ग्लोबल वार्मिंग जागतिकीकरणाच्या लाटेतून प्रत्येकाची बदललेली जीवनशैली ही त्या पाठीमागची मोठी अडचण आहे. ती पूर्ववत होणे कठीण असले, तरी त्यात सुधारणा निश्चित होऊ शकते. त्यासाठी व्यापक स्वरूपात अभियान हाती घेतल्यावरच पदरात काही पडण्याची शक्यता आहे.

ग्लोबल वार्मिंगमुळे तापमानात सातत्याने होणारी वाढ चिंताजनक असल्याचे निरीक्षण कोपर्निकस संस्थेचे संचालक कार्लो बुओनटेंपो यांनी नोंदवले आहे. वातावरणातील हरितगृह वायूत सातत्याने वाढ झाली नसती तर तापमान वाढदेखील झाली नसती. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीवरील तापमानात विक्रमी वाढ होत असल्याबद्दल बुओनटेंपो यांनी चिंता व्यक्त केली. तापमानातील चढउताराच्या मालिकेतून वाईट संकेत मिळत असल्याचा दावा आहे.

अचानक तापमानाचा पारा खाली घसरला..

राज्यातील सरासरी किमान तापमान खाली आल्याने अवघा महाराष्ट्र गारठला. पुणे शहरातील एनडीए भागाचे तापमान तर चक्क ८.७ अंश सेल्सिअस इतके सर्वात नीच्चांकी ठरले. आणि पुणेकर गारठले. अनेक ठिकाणचा पारा १० ते ११ अंशांवर खाली आला. दरम्यान बंगालच्या उपसागरात फेंगल या चक्रीवादळाची निर्मिती झाल्या मुळे देशात दाट धुके वाढण्याची शक्यता आहे. खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) भागातील किमान तापमान ८.७ अंशांवर खाली आल्याने गुरुवारी ते राज्यात नीच्चांकी ठरले. अहिल्यानगरचाही पारा ९.८ अंशांवर खाली आल्याने नगर जिल्हा गारठला आहे. गुरुवारी राज्याचे सरासरी किमान तापमान ११ ते १२ अंशांवर खाली आल्याने अवघ्या राज्याला हुडहुडी भरली. शुक्रवारी बंगालच्या उपसागरात फेंगल नावाचे चक्रीवादळ तयार होत असल्याने वातावरणात आणखी बदल होऊन दाट धुके अन् थंडीची तीव्र १ डिसेंबरपर्यंत वाढणार आहे.

### २०२४ सर्वात उष्ण वर्ष...

उष्णता निर्देशांकाची सुरक्षित मर्यादा ही ३० अंश सेल्सिअस असून कमाल मर्यादा ३५ अंश सेल्सिअस आहे. उष्णता निर्देशांक ३० अंश ते ३५ अंश गेल्यास शरीरास थंड करताना शरीरातील द्रव पदार्थांची पातळी कमी होऊ लागते. परंतु २०२४ मधील वाढत्या उष्णतेच्या लाटा, भयानक वादळे आणि अचानक आलेला पूर या घटनांमुळं यंदा जगभरात हजारो लोकांना जीव गमवावा लागला आहे. जागतिक तापमानवाढीमुळे या घटनांमध्ये वाढ झाली आहे. युरोपीयन हवामान विभागाने वर्तवलेल्या शक्यतेनुसार, २०२४ आत्तापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष म्हणून नोंदवण्यात येणार आहे.

या उष्णतेच्या संकटामुळे पाण्याचे दुर्भिक्ष या संकटाने डोके वर काढले. कारण पाणी या निसर्गदत्त देणगीच्या तुटवड्यामुळे भविष्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असताना वाढती उष्णतेची लाटेने विज्ञान युगात सद्य:स्थितीतच विक्राळ रूप धारण केले. शहरीकरण, औद्योगिकीकरणामुळे पाण्याची मागणी वाढली. पाणी मिळत नसल्याने आणि शुद्ध पाण्याच्या अभावामुळे अनेक लोकांनी आपले प्राण देखील गमावले आहेत. पण हे संकट आणखी भीषण होणार आहे का याचे भय कायम आहे.

यंदाच्या वर्षी ऋतूंमध्ये फार तफावत जाणवली. परतीच्या पावसाने पश्चिम महाराष्ट्रासह विदर्भात शेतीवर पाणी फेरले. हा पाऊस जाण्याच्या मार्गावर वाटत होता परंतु संपण्याचे नाव घेत नव्हता. राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे बळीराजा चिंतेत आला. शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. संपूर्ण दसरा पावसामध्येच गेला. दिवाळी सण जवळ आला तरी देखील राज्यात पाऊस सुरूच होता. या सगळ्यामुळे ऋतूंचे चक्र बदलले असल्याचे चित्र निर्माण झाले.

अनियमित ऋतुचक्र बिघडल्यामुळे जिल्ह्यात रब्बी हंगामाला देखील तब्बल वीस ते पंचवीस दिवस विलंबाने प्रारंभ झाला. लांबलेल्या पावसामुळे जिल्ह्यात खरीप हंगाम यावर्षी लांबला. अजूनही काही भागात भातपीक कापणी आणि नाचणी पीक वेचणी सुरू आहे. तसेच लांबलेल्या खरीप हंगामाचा मोठा परिणाम यावर्षीच्या रब्बी हंगामावर झाला. या बरोबरीनेच ऋतुचक्र बदलल्याने आता आंबा हे फळ देखील दिवसेंदिवस उशिरा खायला मिळता आहे. काही वर्षानी आंबा फेब्रुवारी मार्च मध्ये न मिळता जुलै ऑगस्टमध्ये मिळेल कि काय अशी शक्यता निर्माण झाली आहे.


एकूणच अलीकडील काही वर्षात ऋतुचक्र बदलत चालले असून ग्लोबल वार्मिंगचा फटका ऋतुचक्रालाही बसला आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यांत आता पाऊसच पडत नसल्याचे चित्र दरवर्षी आढळत असून, पावसामधील असमतोलाने ऋतुचक्र बदलले आहे . निसर्गात ऋतूनिहाय फळ, फुले आणि भाजीपाला उपलब्ध होत असतात. यामुळे त्या-त्या मोसमात त्याचा आस्वाद घेण्याची मजा औरच असते. याप्रमाणेच ऋतूनिहाय फुलणाऱ्या फुलांनाही तेवढेच महत्त्व आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून वातावरणात झालेल्या बदलाने प्रत्येक ऋतू जवळपास एक ते दीड महिने उशिराने येत असल्याचे चित्र आहे.ग्लोबल वॉर्मिंगची ही खरी सुरुवात असून त्यामुळे ऋतुचक्रात बदल होत असल्याने हे परिणाम असल्याचे चित्र आहे.


हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

# सिनेमॅटिक

पहिल्याच नजरेत एखाद्या व्यक्तीतील कलागुण हेरण्याचे कौशल्य सर्वांनाच असते असे नाही. मात्र बॉलिवुड असो किंवा हॉलिवुड या दोन्ही ठिकाणी यशाचे शिखर गाठणारे कलाकार हे दिग्दर्शकांनी किंवा निर्मात्यांनी त्यांना पहिल्याच नजरेत हेरले आहेत. सुभाष घई, यश चोप्रा, सुरज बडजात्या यासारख्या नामवंत दिग्दर्शकांनी अनेक बड्या कलाकारांचे अभिनय कौशल्य ओळखून त्यांना आपल्या चित्रपटात ब्रेक दिला आणि ते एका रात्रीत सुपरस्टार झाले.




## पहिला ब्रेक मिळाला आणि...

सिनेविशेष

**सोनम परब**
सिनेअभ्यासक

बॉलीवूडचे पहिले सुपरस्टार राजेश खन्ना यांचा किस्सा सांगता येईल. त्यांना लहानपणापासूनच अभिनयाची हौस. युनायटेड प्रोड्यूसर्स आणि फिल्मफेअरच्या बॅनरखाली १९६५ मध्ये नवीन अभिनेत्याच्या शोधासाठी एक स्पर्धा आयोजित केली. यात दहा हजार मुले सहभागी झाले होते आणि त्यापैकी आठ मुले अंतीम फेरीत पोचले. यात राजेश खन्ना होते. या स्पर्धेमुळे त्यांना १९६६ मध्ये 'आखिरी खत' मध्ये काम करण्याची संधी मिळाली आणि तेथूनच या स्टारपर्वाला सुरुवात झाली. कृष्णधवल जमान्यातील मेगास्टार अशोक कुमार यांचा बॉलिवुडमधील प्रवेश देखील रंजक आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत तीनशेपेक्षा अधिक चित्रपट साकारले. वास्तविक ते १९३४ मध्ये न्यू थिएटरमध्ये एक लॅब असिस्टंट म्हणून काम करत होते. त्यानंतर त्यांना त्यांच्या मेहुण्याने मुंबईला बोलावले. १९३६ मध्ये बॉम्बे टॉकीजचा चित्रपट 'जीवन नैया' साकारत असताना मुख्य अभिनेता आजारी पडला. यादरम्यान बॉम्बे टॉकीजचे मालक हिमांशू रॉय यांची नजर अशोक कुमार यांच्यावर पडली. तेव्हा हिमांशू यांनी अशोककुमार यांना चित्रपटात काम करण्याची विनंती केली आणि अशा रितीने पहिला ब्रेक मिळाला.

बीग बी अमिताभ बच्चन यांचे उदाहरण घ्या. गीतकार जावेद अख्तर यांनी अनेकदा यासंदर्भात म्हटलयं की '' अमिताभ बच्चन यांना पाहताच मी म्हटलो होतो की हा तरुण भविष्यातील सुपरस्टार आहे.'' ही गोष्ट त्यांचे सहलेखक सलीम खान यांनीही मान्य केली आहे. तत्पूर्वी अमिताभ यांच्याविषयीचे भाकित त्यांना पहिला ब्रेक देणारे ख्वाजा अहमद अब्बास यांनी देखील केले होते. कारण त्यांनी 'सात हिंदुस्थानी' चित्रपटात अमिताभ यांना ब्रेक दिला होता, हा चित्रपट फारसा चालला नाही. तरीही लेखक आणि दिग्दर्शक अब्बास यांनी अमिताभ यांचा खर्जनीतील आवाज आणि व्यक्तिमत्त्व पाहता त्यांच्यातील 'स्पार्क' ओळखला होता. त्यानंतर लवकरच अमिताभ यांनी 'जंजीर' चित्रपटात अँग्री यंग मॅनची भूमिका साकारत अब्बास यांचे म्हणणे सार्थ ठरविले. जीवंत अभिनयाच्या जोरावर अमिताभ बच्चन यांनी बॉलिवुडवर छाप पाडली. आज त्यांची ओळख बॉलिवुडचे महानायक म्हणून आहे.

**हॉलिवुडमध्ये देखील उदाहरण**

असाच किस्सा हॉलिवुडचे महान अभिनेते मार्लन ब्रँडो यांचा आहे. ब्रँडो यांना नाटक 'ए स्ट्रीटकार नेम्ड डिझायर' (१९४७) मध्ये स्टॅनली कोव्हास्कीचे पात्र साकारताना प्रसिद्ध दिग्दर्शक एलिया कझान यांनी पाहिले. त्यांना ब्रँडो यांच्या अभिनयाची उंची कळाली. हा व्यक्ती हॉलिवुडचा स्टार होऊ शकतो, असे त्यांना वाटले. कझान यांनी तेच नाटक १९६१ मध्ये चित्रपटाच्या रुपात आणले आणि त्यात मार्लन ब्रँडो यांना प्रमुख भूमिका दिली. पहिल्याच चित्रपटातच ब्रँडो यांनी अभिनयाची छाप पाडली आणि ती प्रेक्षकांना नैसर्गिक आणि वास्तववादी वाटली. नंतर ब्रांडो यांच्या अभिनयाने 'द गॉडफादर' अजरामर ठरला.



**शाहरुख खानचा किस्सा**

बॉलिवुडचा किंग शाहरुख खानसमवेत देखील असेच घडले. शाहरुख खानला पहिल्यांदा ब्रेक टिव्ही मालिका 'फौजी'च्या रुपातून मिळाला. १९८८ मध्ये प्रसारित झालेल्या मालिकेत शाहरुख खानने लेफ्टनंट अभिमन्यू रायची भूमिका केली होती. या पात्राने शाहरुख खानला जबरदस्त ओळख मिळाली. परंतु सुरुवातीला या भूमिकेसाठी शाहरुखची निवड झालेली नव्हती. शााहरुखला लेफ्टनंट अभिमन्यु रॉयची भूमिका देण्याचे ठरल्यानंतर दिग्दर्शक राजकुमार कपूर यांनी मालिकतील पटकथेत बरेच बदल केले. मूळ मालिकेत शाहरुखची भूमिका अतिशय किरकोळ होती. पण चित्रिकरणाच्या पहिल्याच दिवशी कपूर यांचा मूड बदलला आणि त्यांनी प्रमुख पात्र म्हणून शाहरुख खानला देण्याचे निश्चित केले. या मालिकेने शाहरुख खानला ओळख मिळवून दिली आणि त्यानंतर त्यांच्याकडे टिव्ही मालिकांची रांग लागली. मात्र दोन मालिका करताच शाहरुख खान मुंबईला आले. शाहरुख खानचा पहिला चित्रपट 'दिवाना' १९९२ मध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर बाजीगर, दिलवाले दुल्हनिया ले जायेगे, 'डर'सारख्या चित्रपटांनी सुपरडुपर कामगिरी केली.

**खिलाडीकुमारचा फोटो पाहिला अन ब्रेक दिला**

खिलाडीकुमार अक्षयकुमारचा बॉलिवुडमधील संघर्ष सर्वांनाच ठाऊक आहे. १९८७ मध्ये 'आज' नावाच्या चित्रपटात अक्षयकुमारची भूमिका केवळ १७ सेकंदाची होती. कालांतराने हाच कलाकार बॉलिवुडचा बेताज बादशहा होईल, याचा कोणी स्वप्नातही विचार केला नव्हता. ती भूमिका कराटे प्रशिक्षकाची होती. प्रारंभीच्या काळात मॉडेलिंगसाठी त्याने बरीच मेहनत घेतली. बंगळूरमध्ये रॅप वॉक करण्याची ऑफर मिळाली आणि त्यासाठी त्याला मुंबईहून सकाळी सहाची फ्लाइट पकडायची होती. परंतु ते विमान हुकले. हा मुक्काम त्याच्या पथ्यावर पडला. त्याने कामासाठी नटराज स्टुडिओत चक्कर मारण्यास सुरुवात केली. तेथे अक्षयकुमारची भेट प्रमोद चक्रवर्ती कंपनीचे मेकअप आर्टिस्ट नरेंद्र यांच्याशी झाली. नरेंद्र यांनी अक्षयकुमारचे फोटो निर्माते प्रमोद यांना दाखविले. प्रमोद यांना अक्षयचे फोटो एवढे आवडले की त्यांनी पुढचा चित्रपट 'दीदार'मध्ये आघाडीच्या भूमिकेसाठी निवडले. त्याचवेळी त्यांनी पाच हजार हजाराचा धनादेश दिला.

**कंगना आणि नवाजुद्दीन सिद्दीकी**

पहिल्याच नजरेत शोधल्या जाणाऱ्या तारकांची मोठी यादी आहे. नवाजुद्दीन सिद्दीकीची चित्रपटातील वाटचाल खुपच खडतर राहिली आहे. ते बॉलिवुडमध्ये संधी मिळावी यासाठी धडपडत असताना नुसता स्क्रिन टेस्ट घेण्यासाठी देखील कोणीही तयार होत नसत. मात्र एक दिवस अनुराग काश्यप यांची त्यांच्यावर नजर पडली आणि त्यांनी 'गँग्स ऑफ वासेपूर' चित्रपटात प्रमुख भूमिका दिली. या चित्रपटाने नवाजुद्दीन यांना असामान्य अभिनेता म्हणून ओळख मिळवून दिली. विशेष म्हणजे तत्पूर्वी आमीर खानच्या सरफरोश चित्रपटात नवाजुद्दीनची केवळ दोन मिनिटांची भूमिका आहे. पण 'गँग्स ऑफ वासेपुर' चित्रपटाने नवाजुद्दीन सिद्दीकींची दुनिया बदलली. अशीच नजर महेश भट्ट यांची कंगना राणावतवर पडली आणि त्यांनी कंगनाला 'गँगस्टर'मध्ये भूमिका देत बॉलिवुडला नवा चेहरा मिळवून दिला. पहिल्याच चित्रपटात तिची अभिनय क्षमता पाहून प्रेक्षकांनी तिला सुपरस्टार मानले. त्यानंतर कंगनाने 'क्विन', 'तनु वेड्स मनु' मधील अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. अशीच गोष्ट हॉलिवुडची मेरिल स्ट्रिपची आहे. शिवाय अलिकडच्या काळातील बॉलिवुडचा कलाकार राजकुमार राव याला देखील पहिल्याच नजरेत हंसल मेहताने 'शाहिद' चित्रपटासाठी निवडले आणि महत्त्वाची भूमिका दिली. या चित्रपटातून त्याने राष्ट्रीय पुरस्कार देखील जिंकला. अभिनयक्षमता पाहून निर्मात्यांनी राजकुमार रावला अनेक चांगले चित्रपट दिले. आज तो अभिनयातील 'राजकुमार' म्हणून ओळखला जातो अगदी लिओनार्दो डिकेप्रियोप्रमाणे. लिओनार्दोचे सुरवातीचे चित्रपट 'वुल्फ ऑफ वॉल स्ट्रीट' आणि 'इनसेप्शन' हे त्याच्या अभिनय कौशल्याची पावती देणारे ठरले.

एकंदरीतच बॉलिवुड असो किंवा हॉलिवुड दोन्ही ठिकाणी काही महानायक आणि महानायिका पहिल्याच नजरेत गवसल्या आहेत आणि त्यांनी आपल्या अभिनयातून ते सत्य अधोरेखित केले आहे.

## प्रज्ञाला करायचंय शुभमनसोबत डेटींग



बॉलीवूड आणि क्रिकेटमधील नाते नवीन नाही. शर्मिला टागोर–मन्सूर अली खानपासून अनुष्का शर्मा–विराट कोहलीपर्यंत, या जगाने अनेक रोमँटिक जोड्या पाहिल्या आहेत. आता या यादीत आणखी एक नाव जोडले जाण्याची चर्चा आहे.

अभिनेत्री प्रज्ञा जयस्वाल आणि युवा क्रिकेटर शुभमन गिल. बॉलिवूडच्या अशा कितीतरी अभिनेत्रींच्या डेटींगलिस्टमध्ये हा क्रिकेटर आहे. काही महिन्यांपूर्वी सारा अली खान हिचं नाव शुभमन गिलशी जोडलं जात होतं. आता अभिनेत्री प्रज्ञा जैसवाल शुभमनला डेट करण्याच्या इच्छेमुळे चर्चेत आहे. नुकत्याच एक मुलाखतीत प्रज्ञा जैसवालनं जर संधी मिळाली तर शुभमन गिलला डेट करायला आवडेल असं विधान तिनं केलं आहे. शुभमन तिला क्यूट वाटतो, असंही ती या मुलाखतीत म्हणाली होती. प्रज्ञा नुकतीच अभिनेता अक्षय कुमारसोबत 'खेल खेल में' चित्रपटात दिसली होती. प्रज्ञाला खरंतर एका फॅनकमेंटमध्ये असं कोणीतरी सांगितलं होतं की प्रज्ञा आणि शुभमन गिल कपल म्हणून चांगले दिसतील. यावर प्रज्ञानं लाजत, हो तो खरंच फार क्यूट आहे. चला मग, जर तुम्हा सगळ्यांना असं वाटतं असेल तर मला क्रिकेटरशी काही प्रॉब्लेम नाही. तो खूप चांगला माणूस आहे.

एखाद्या क्रिकेटरला डेट करशील का असं विचारलं असता प्रज्ञा जैयस्वाल म्हणाली,नशिबात हेच लिहिले असेल तर ते योग्यच आहे. हे शक्य होऊ शकते. व्यक्ती चांगली असेल तर कपल होण्यास काही अडचण येत नाही. प्रज्ञाने २०१४ मध्ये तमिळ थ्रिलर विराट्टूमधून आपल्या फिल्मी प्रवासाला सुरुवात केली. तेलुगू चित्रपटांतून तिने दक्षिणेतील चाहत्यांमध्ये आपली छाप उमटवली होती. यापूर्वी सारा अली खान, अनन्या पांडे आणि टीव्ही अभिनेत्री रिद्धिमा पंडितसोबतही शुभमन गिलचं नाव जोडलं गेलं होतं. रिद्धिमा पंडित शुभमन गिलसोबत लग्न करणार असल्याच्या बातम्याही येऊ लागल्या होत्या. साराने एकदा करण जोहरच्या चॅट शोमध्ये स्पष्ट केले होते की सारा, जिचे नाव शुभमन गिलसोबत जोडले जात आहे, ती प्रत्यक्षात तिचं नसून सचिन तेंडुलकरच्या मुलीचं आहे.

## सिनेकलाकारांचे हेअर ट्रान्सप्लांट

स्वतःच्या व्यक्तीमत्वाची काळजी घेणे हा मनोरंजन उद्योगाचा नेहमीच महत्त्वाचा भाग राहिला आहे. लाखो लोकांना मोठ्या पडद्यावर दिसणारा चेहराच सल्याने, सर्वोत्तम दिसणे खूप महत्त्वाचे आहे. मात्र, असे काही बॉलिवूड सेलिब्रिटी आहेत ज्यांना केसांचे प्रत्यारोपण करावे लागले. कारण त्यांच्या केसगळतीमुळे त्यांच्या करिअरवर परिणाम होत होता. यामध्ये बीग बीपासून ते अक्षय कुमारपर्यंत यांचा समावेश आहे.



**अमिताभ बच्चन** : अमिताभ हे बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखले जात असले तरी नव्वदीचे दशक त्यांच्या करिअरसाठी चांगला काळ नव्हता. त्यांच्या डोक्यावरील केस कमी झाले झाल्याने केस हळूहळू पातळ होत होते. त्यांचे बहुतेक चित्रपट फ्लॉप घोषित झाले आणि त्यांची कंपनी जवळजवळ दिवाळखोर झाली. कौन बनेगा करोडपती या शोने आयुष्य बदलले आणि त्यांना चार्टवर परत आणले.



**सलमान खान** : २००७ मध्ये सलमान हेअर ट्रान्सप्लांट करणार असल्याच्या अफवा वेगाने पसरल्या होत्या. त्याच्यावर दुबईत प्रत्यारोपण झाल्याचे समजते. जेव्हा त्याचे केस गळताना दिसले तेव्हा हे खरे ठरले.

**अक्षय कुमार** : अक्षय कुमार ४० वर्षांचा होता तेव्हा त्याच्या संपूर्ण डोक्यावर टक्कल पडण्याच्या खुणा होत्या. त्यामुळे केस गळण्यापासून वाचवण्यासाठी त्याने हेअर ट्रान्सप्लांटचा पर्याय निवडला.


**कपिल शर्मा** : करिअरच्या सुरुवातीच्या काळात कपिलचे केस गळू लागले होते. सुरुवातीच्या काळात आपले करियर बुडण्यापासून वाचवण्यासाठी त्याने केस प्रत्यारोपण केले.

**हिमेश रेशमिया** :हिमेशची टोपी कशी प्रसिद्ध झाली हे आपल्या सर्वांना माहीत आहे. पण प्रत्यक्षात तसे नव्हते. कारण त्याचे केस गळती होती. जेव्हा चित्रपटांच्या ऑफर मिळू लागल्या, तेव्हा केस प्रत्यारोपण करून नाट्यमय मेकओव्हर निवडण्यास सुरुवात केली, ज्यामुळे केस प्रत्यारोपण केलं आहे हे ओळखता सुद्धा आलं नाही.

## कलाश्रेष्ठाला आदरांजली



छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई



प्रख्यात अभिनेते आणि दिग्दर्शक राज कपूर यांच्या शताब्दी समारंभाचा एक भाग म्हणून, ५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) राज कपूर यांचे नातू रणबीर कपूर आणि ज्येष्ठ चित्रपट निर्माते राहुल रवैल यांनी एका विशेष सत्रात उपस्थित राहून या कलाश्रेष्ठाला आदरांजली वाहिली. हे सत्र म्हणजे राज कपूर यांचे भारतीय चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदान, त्यांचा चिरस्थायी प्रभाव आणि त्यांच्या कलाकृतींचा उच्च वारसा यांचा आकर्षक धांडोळा होता. रणबीर कपूर यांनी त्यांच्या आजोबांचा विलक्षण प्रभाव विशद करून राज कपूर यांचे चित्रपट काळ आणि सीमा ओलांडतात, हे अधोरेखित केले. आवारा, मेरा नाम जोकर आणि श्री ४२० यांसारख्या चित्रपटांची सार्वत्रिक मोहिनी कशी होती, ते रशियापासून भारतापर्यंत जगभरातील प्रेक्षकांमध्ये खोलवर कसे रुजले यावर त्यांनी स्पष्ट केले. राज कपूर यांच्या चित्रपटांच्या प्रासंगिकतेवर प्रकाश टाकत, रणबीर यांनी आवाराच्या संकल्पनेने जातीवादाचा कसा वेध घेतला, हे नमूद केले; तर श्री ४२० हा लोभ आणि महत्त्वाकांक्षेचे विषय हाताळण्यामध्ये गुंतला होता, प्रेमरोग आणि राम तेरी गंगा मैली यांसारख्या नंतरच्या चित्रपटांची स्त्रियांच्या समस्या आणि सामाजिक आव्हानांवरील नैतिक कथनांसाठी प्रशंसा करण्यात आली, ज्यामुळे काळाच्या पुढे असलेला चित्रपट निर्माता म्हणून राज कपूर यांचा दृष्टिकोन अधोरेखित केला गेला.

राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी), भारतीय राष्ट्रीय चित्रपट अर्काईव्हज (एनएफएआय) आणि फिल्म हेरिटेज फौंडेशन या संस्थांच्या सहकार्याने राज कपूर यांच्या चित्रपटांचे पुनर्संचयन करण्याच्या प्रयत्नांची देखील रणबीर कपूर यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की राज कपूर यांचे दहा चित्रपट याआधीच पुनर्संचयित केलेले असून डिसेंबर २०२४ मध्ये भारतभरात ते प्रदर्शित करण्याचे नियोजन सुरु आहे. भारतीय चित्रपटसृष्टीची पायाभरणी करण्यात राज कपूर यांनी दिलेल्या योगदानाचा सन्मान करत, राज कपूर यांची चित्रपटीय प्रतिभा जतन करण्याच्या तसेच त्याचा उत्सव साजरा करण्याच्या महत्त्वावर रणबीर कपूर यांनी अधिक भर दिला. या सत्रामध्ये चित्रपट निर्मिती, अभिनय आणि सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यात चित्रपटांची विकसित होत गेलेली भूमिका यासंदर्भातील चर्चेचा देखील समावेश होता.

पिता झाल्यानंतर पर्यावरण आणि सामाजिक बदलांप्रती आपण अधिक जागरूक झालो असे सांगताना रणबीर कपूर यांनी कलाकारांना त्यांचे मंच जागतिक कल्याणासंदर्भात ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आणि त्याचे समर्थन करण्यासाठी वापरावेत असे आवाहन केले. जगभरातील महान कलाकारांकडून प्रेरणा घेऊन स्वतःची वेगळी अशी शैली विकसित करण्यासाठी नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देऊन रणबीर यांनी अभिनयात स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

सत्राच्या शेवटी, रणबीर कपूर यांनी हा आदरांजलीपर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल इफ्फीप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि उपस्थित प्रेक्षकांना राज कपूर यांच्या चिरंतन कार्याचा आनंद घेऊन त्याचे हृदयात जतन करण्याचे आवाहन केले. रणबीर याने व्यक्त केलेल्या विचारांना दुजोरा देत राहुल रवैल यांनी चित्रपट सृष्टीवरील तसेच समाजावरील राज कपूर यांच्या कायमस्वरूपी प्रभावाचा उल्लेख केला.

या सत्रात केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभाग सचिव संजय जाजू, सुप्रसिध्द भारतीय चित्रपट निर्माते आणि इफ्फीचे महोत्सव संचालक शेखर कपूर, केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभागाचे संयुक्त सचिव आणि एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रीथूल कुमार आणि केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभागातील चित्रपट विभागाच्या संयुक्त सचिववृंदा देसाई यांनी भाग घेतला.

## 'कांगुवा'चा धमाका



'कांगुवा'मधील बॉबी देओलचा फर्स्ट लूक व्हायरल झाल्यापासून त्याचे चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. चित्रपट १४ नोव्हेंबर रोजी चित्रपटगृहात दाखल झाला असून बॉबीचा क्रूर अवतार प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. चित्रपटात बॉबीसोबत साऊथचा सुपरस्टार सूर्यादेखील आहे. अंदाजे ३५० कोटी रुपये खर्चून बनलेल्या या चित्रपटात दिशा पटानीसुद्धा महत्त्वाच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाला आयएमडीबीवर १० पैकी ९ रेटिंग मिळाले असून दिग्दर्शक शिवाच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटाने पहिल्या दिवशीच धमाकेदार व्यवसाय केला आहे.

साऊथचा हा मोस्ट अवेटेड सिनेमा पाच भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे. तमिळ व्यतिरिक्त तो हिंदी, तेलगू, कन्नड आणि मल्याळम भाषेतही प्रदर्शित झाला आहे. 'कांगुवा'च्या पहिल्याच दिवशी ५ लाख ५३ हजारांहून अधिक तिकिटांची विक्री झाली होती. आगाऊ बुकिंगमध्येच या चित्रपटाने १०.१६ कोटींची कमाई केली होती. 'कंगुवा' शुक्रवारपर्यंत ४० कोटींचा व्यवसाय करू शकतो. तर जगभरात बॉक्स ऑफिसवर ६० ते ७० कोटी रुपयांचा गल्ला कमावण्याची शक्यता आहे.

चित्रपट रिलीजच्या दिवशी तामिळ आवृत्तीतून ११ ते १३ कोटी रुपयांची कमाई केली आहे. तर तेलुगु व्हर्जनद्वारे ५.५० ते ६ कोटींचा व्यवसाय केला आहे. हिंदी आवृत्तीच्या माध्यमातून या चित्रपटाने ४ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. गुरुवारी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या पहिल्या दिवशी २२ कोटींचा व्यवसाय केला आहे. 'कांगुवा'ला चेन्नई, पाँडेचेरी आणि कोईम्बतूर येथून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाचे ओपनिंग डे कलेक्शन चांगलेच झाले आहे पण आता चित्रपट हा वेग कायम ठेवू शकेल की नाही हे पाहणे बाकी आहे.

रविवार, दि. १ डिसेंबर २०२४ पंढरी संचार

# विश्ववेध

## दृष्टीदायी जीवनसत्त्वे



आपल्या डोळ्यांनीच आपण हे जग पाहत असतो. त्यामुळे डोळ्यांची काळजी घेणे क्रमप्राप्त ठरते. वाढत्या वयोमानानुसार मोतीबिंदूची समस्या उद्भवते. डोळ्यातील लेन्समध्ये धूसरपणा आल्याने डोळ्यांवर पडणारा प्रकाश परिणामकारकतेने रेटिनापर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे दृष्टी धूसर होते किंवा अस्पष्ट दिसू लागते. शस्त्रक्रिया हा मोतीबिंदूसाठी उपलब्ध असलेला एकमेव उपचार आहे. डोळ्यांमधील लेन्समध्ये फ्री रॅडिकल्सचे (ऑक्सिडेटिव्ह इजा करणारे अस्थिर रेणू) प्रमाण जास्त झाल्याने मोतीबिंदू तयार होतो. खालील जीवनसत्त्वांचे नियमित सेवन केल्याने मोतीबिंदू तयार होण्याच्या प्रक्रियेचा वेग कमी होतो, असे तज्ज्ञ सांगतात. अर्थात, तुम्ही सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही वयोमानपरत्वे मोतीबिंदू तयार होणे अपरिहार्य असते. या सुपरफुड्समुळे मोतीबिंदू तयार होण्याच्या व वाढण्याच्या प्रक्रियेचा वेग थोडा कमी होऊ शकतो. पण, या पदार्थांमुळे मोतीबिंदूला पूर्ण प्रतिबंध करता येत नाही.

**ई जीवनसत्त्व :** ई जीवनसत्त्व हे एक अत्यंत प्रभावी अँटिऑक्सिडंट आहे. काही अभ्यासांनुसार, ई जीवनसत्त्व मोतीबिंदू आणि वयोमानानुसार होणाऱ्या मॅक्युलर डीजेनेरेशनचा (डोळ्याच्या मधोमध असलेल्या मॅक्युला कमकुवत होणे) धोका कमी करू शकते. बदाम, ब्रोकोली, किवी, आंबा, पालक आणि टोमॅटोमध्ये ई जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असते.

**क जीवनसत्त्व :** फ्री रॅडिकल्सला निष्प्रभ करून, सी किंवा क जीवनसत्त्व डोळ्याच्या लेन्सला ऑक्सिडेटिव्ह ताणापासून (शरीरातील मुक्त रॅडिकल्स (अस्थिर रेणू) आणि अँटिऑक्सिडंट्स यांच्यातील असंतुलन) संरक्षित करण्यास मदत करते. या शिवाय, क जीवनसत्त्व डोळ्यातील इतर अँटिऑक्सिडंट्सच्या पुनर्निर्मितीत योगदान देते, ज्यामुळे लेन्सची संरक्षणक्षमता आणखी वाढते. संत्रे, लिंबू आणि आवळा यांसारख्या आंबट फळांमध्ये सी जीवनसत्त्व आढळते.

**अ जीवनसत्त्व :** अ जीवनसत्त्व डोळ्यांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हे अश्रुपटलाची गुणवत्ता सुधारते, रेटिनाचा ऱ्हास होण्यास प्रतिबंध करते आणि मोतीबिंदू तयार होण्यापासून रोखण्यास मदत करते. हिरव्या पालेभाज्या, गाजर, आंबा, बकरीचे यकृत, भोपळी मिरची आणि भोपळा या अन्नपदार्थांमध्ये अ जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात आढळते.

**ल्यूटिन आणि झिएक्सँथिन :**

ल्यूटिन आणि झिएक्सँथिन हे कॅरोटिनॉइड्स आहेत, जे वनस्पतींमध्ये तयार होतात. ते मोतीबिंदू, डोळे कोरडे होणे, आणि मॅक्युलर डीजेनेरेशन (डोळ्याच्या मधोमध असलेला मॅक्युला कमकुवत होणे) यांसारख्या डोळ्यांच्या अनेक समस्यांना प्रतिबंध करतात. ब्रोकोली, अंड्याचा पिवळा बलक, केळ, किवी, कोथिंबीर, आणि लाल भोपळी मिरची यांसारख्या अन्नपदार्थांमध्ये ल्यूटिन आणि झिएक्सँथिन मुबलक प्रमाणात असतात.

**बी कॉम्प्लेक्स जीवनसत्त्व :**

संतुलित आहार किंवा सप्लिमेंट्सच्या माध्यमातून बी कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वाचे पुरेशा प्रमाणात सेवन केल्यास तुम्ही डोळ्यांचे एकूण आरोग्य टिकवू शकता आणि मोतीबिंदू होण्याचा धोका कमी करू शकता. हिरव्या पालेभाज्या, शेंगदाणे, बिया, मांस, दुग्धजन्य पदार्थ, होल ग्रेन, कडधान्ये इत्यादींमध्ये बी कॉम्प्लेक्स जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असते. ◆◆◆

## गुलामगिरीचा स्पर्श न झालेला देश



जगात असे अनेक देश आहेत, जे एकेकाळी कुणाचे तरी गुलाम राहिले आहेत; पण तुम्हाला जाणून आश्चर्य वाटेल की, भारताचा शेजारी देश नेपाळ हा इतिहासात कधीही कोणाचा गुलाम झाला नाही. अनेक आक्रमणकर्त्यांनी वेगवेगळ्या देशांवर आक्रमण केले, गावं लुटली. भारताचा इतिहास पाहिला तरी हे लक्षात येते की इंग्रजांनी भारतावर जवळजवळ दोन शतके राज्य केले; पण तुम्हालाही प्रश्न असा पडला असेल की, नेपाळवर कोणी राज्य का केले नाही?

नेपाळ हा तिबेट, भारत आणि चीन यांच्यातील व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. सर्व व्यापार याच मार्गाने होत होते. त्याची भौगोलिक स्थिती अशी आहे की, इथपर्यंत पोहोचणे फार कठीण होते. हिमालयातील टेकड्या आणि घनदाट जंगले कोणत्याही आक्रमणकर्त्यासाठी एक मोठा अडथळा होता. तसेच नेपाळी लोक नेहमीच शूर योद्धा राहिले आहेत. गोरखा सैनिकांचे शौर्य जगभर प्रसिद्ध आहे. अनेक युद्धांमध्ये त्यांनी आपले सामर्थ्य दाखवून दिले आहे. इंग्रजांशी झालेल्या युद्धातही गोरखा सैनिक अतिशय शौर्याने लढले होते. मुस्लिम राज्यकर्त्यांनी अनेकवर नेपाळवर हल्ले केले; पण त्यात त्यांना यश आले नाही. शमसुद्दीन इलियास शाह आणि मीर कासिम यांनी नेपाळवर हल्ला केला होता; पण गोरखा सैन्याने त्यांचा पराभव करून त्यांना परत पाठवले होते. इंग्रजांनीदेखील नेपाळवर राज्य करण्याचाही प्रयत्न केला. सन १८१४ ते १८१६ या काळात ब्रिटिश आणि नेपाळमध्ये युद्ध झाले, ज्याला गोरखा युद्ध म्हणतात. या युद्धानंतरच सुगौलीचा तह झाला. त्यानुसार नेपाळने कुमाऊं आणि गढवाल भाग इंग्रजांच्या स्वाधीन केले आणि इंग्रजांनी पुन्हा नेपाळवर हल्ला न करण्याचे वचन दिले. नेपाळचा इतिहास हा त्या देशाचा इतिहास आहे, ज्याने आपले स्वातंत्र्य जपले. नेपाळची ही कथा आपल्याला सांगते की, कोणत्याही देशाचे स्वातंत्र्य वाचवण्यासाठी तेथील लोकांची एकता आणि शौर्य खूप महत्त्वाचे असते. ◆◆◆

## आरामदायी जीवनशैली

*आपल्याकडे वेदांमध्ये म्हटले आहे की 'चरैवेति चरैवेति' (चालत राहा, चालत राहा). जो चालत राहतो, त्याचे भाग्यही चालत राहते तसेच जो एकाच जागी बसून राहतो, त्याचे भाग्यही बसकण मारते! हे आरोग्याच्या दृष्टीने तंतोतंत खरे आहे. सध्या बदलत्या जीवनशैलीसोबत कामाचं स्वरूपही बदलत चाललंय. आजकाल बहुतेक लोकांना कामाच्या दरम्यान बराच वेळ बसून राहावे लागते, कारण बहुतेक लोक डेस्क जॉब करतात. 'वर्क फ्रॉम होम' देखील सामान्य झाले आहे. अशा परिस्थितीत, आपण काम करताना आपला संपूर्ण दिवस खुर्चीवर किंवा सोफ्यावर बसून घालवतो आणि शारीरिक हालचाली कमी करतो. पण तुम्हाला माहिती आहे का, की आपण जेवढे आरामात काम करत आहोत, तेवढेच ते आपल्याला आजारीही बनवत आहे. होय, नुकत्याच झालेल्या एका अहवालात असे आढळून आले आहे की, जे लोक जास्त वेळ बसून आहेत, त्यांचा लवकर मृत्यू होण्याचा धोका असतो. कारण, दिवसभर बसून राहिल्याने अनेक गंभीर आजार होतात.*

### तज्ज्ञ काय म्हणतात?

न्यूयॉर्क पोस्टमधील एका लेखानुसार, जास्त वेळ बसून राहिल्याने लठ्ठपणा, स्नायू कमकुवत होणे, मणक्याचा ताण, कमी रक्तदाब आणि संपूर्ण शरीरातील रक्त परिसंचरण कमी होऊ शकते. जास्त वेळ बसणे पाठ, कंबर, नितंब आणि हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्याच वेळी, दुसऱ्या अहवालानुसार, जास्त वेळ बसल्याने देखील लवकर वृद्धत्व होते. उदाहरणार्थ, जर एखादी महिला दिवसातून ९ ते ११ तास बसली तर तिला इतर स्त्रियांच्या तुलनेत लवकर मृत्यूचा धोका ५७ टक्के असतो.



### जास्त वेळ एकाच ठिकाणी बसल्याने होतात 'हे' आजार :

- जास्त वेळ बसल्याने हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.
- जास्त वेळ बसल्याने चयापचय कमी होऊ शकतो. त्यामुळे टाईप-२ मधुमेहाचा धोका वाढतो.
- जास्त वेळ बसल्याने तणाव आणि चिंता वाढते.
- हाडे आणि स्नायू कमकुवत होऊ शकतात.

### यातून दिलासा कसा मिळणार?

- काम करताना नियमित ब्रेक घ्या.
- उठून दर तासाला किमान ५-१० मिनिटे फिरा.
- दररोज थोडासा व्यायाम करा, जसे की स्ट्रेचिंग किंवा चालणे.
- डेस्क जॉब असलेले लोक काही काळ उभे राहून काम करू शकतात.

### इतर संशोधकांचे मत

तज्ज्ञांचे मत आहे की, प्रौढ व्यक्तीने आठवड्यातून २ ते ३ दिवस १५० मिनिटे सतत व्यायाम केल्यास धोका कमी होऊ शकतो. एवढा उपक्रम आठवडाभर पुरेसा आहे. त्याचवेळी ह्युस्टन विद्यापीठाचे प्रोफेसर मार्क हॅमिल्टन यांनीही असा सल्ला दिला होता की, मानवी शरीर हे बसण्यासाठी नसून, फिरण्यासाठी बनलेले आहे. असे केल्यानेच तुम्ही निरोगी राहू शकता, तर सर्वांनी त्याचे पालन केले पाहिजे. ◆◆◆

## 'ब्ल्यू झोन'मधला 'दीर्घायुषी आहार'

ज्या देशातील लोकांचे आरोग्य चांगले आहे, त्या देशातील भूभागाला 'ब्ल्यू झोन' म्हणतात. त्या ठिकाणाचे राहणीमान, आरोग्य, शारीरिक सक्रियता आदर्श असते. या ठिकाणी राहणाऱ्या लोकांचा आहार वेगळा आहे. हे लोक चिकन-मटणपेक्षा जास्त शाकाहारी पदार्थ खातात. त्यांच्यानुसार सहा शाकाहारी पदार्थांना दीर्घायुष्यासाठी उत्तम आहार मानले जाते.

हार्वर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थचे सल्लागार वाल्टर विल्लेट म्हणतात, मांसाहार करणे एखाद्या रेडिएशनसारखे आहे. त्याची सेफ लेव्हल आम्हाला माहीत नसते. संशोधनात पाहिले गेले आहे की मासांहारी खाणाऱ्यापेक्षा शाकाहारी खाणारे आठ वर्ष जास्त जगतात. ब्ल्यू झोनच्या आहारात सहा भाज्यांचा समावेश आहे. याला दीर्घायुष्यासाठी सर्वोत्तम पदार्थ म्हटले गेले आहे. यामध्ये पालक, कोबी, सलगमची पाने (हिरवी भाजी), चार्ड (हिरवी पालेभाजी), कॉलर्ड्स (कोबीसारखी भाजी) आणि बीट सारख्या भाज्यांचा समावेश आहे. पालकामध्ये प्रोटिन, फायबर, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के १, फॉलिक ॲसिड, लोह, कॅल्शियम यासारखे प्रमुख पोषक घटक असतात. हे ऑक्सिडेटिव्ह तणावापासून संरक्षण करते, ज्यामुळे पेशींना नुकसान होत असते.



या तीन हिरव्या पालेभाज्या मधुमेह आणि कोलेस्टेरॉलच्या आजारांपासून संरक्षण करतात. हे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका कमी करतात. या सर्वांमध्ये अँटिऑक्सिडंट असतात जे कर्करोगापासून संरक्षण करतात. सलगमच्या पानांमध्ये प्रथिने, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि जस्त असते. त्यामुळे तुमची त्वचा आणि केस निरोगी होतात. अशक्तपणा आणि ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी करते. बीट खाल्ल्याने नसा आणि रक्तप्रवाह सुधारतो. त्यात नायट्रेट असते जे रक्तदाब नियंत्रित करते. यामुळे तुमचा स्टॅमिना सुधारतो. पचनक्रिया चांगली होण्यासाठी बीट फायदेशीर आहे. ◆◆◆

## मुंग्या : शेतीच्या प्रणेत्या?

शेतीचा शोध हा मानवी विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. शेतीमुळे भटका, शिकारी माणूस एका जागी स्थिर झाला. अन्नाची सोय झाल्याने त्याला अन्य गरजेच्या गोष्टी तयार करण्यासाठी फुरसत मिळाली. मात्र, शेतीचा प्रारंभ माणसाने केला, असे नाही. मुंग्यांसारख्या छोट्या जीवांनी शेती सारखी प्रक्रिया तत्पूर्वीच सुरू केली होती, असे एका संशोधनातून दिसून आले आहे. या संशोधनानुसार ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी एका उल्कापाताच्या आघातामुळे भूतलावर मोठे बदल घडून आले आणि त्यानंतर लवकरच जगाच्या दृष्टिकोनातून लहान असणाऱ्या या जीवांनी बुरशीची शेती करण्यास सुरुवात केली.

प्राचीन शेतीचा अभ्यास करण्यासाठी या संशोधनात जनुकीय डेटाचे विश्लेषण करण्यात आले. या विश्लेषणातून शाश्वत शेती पद्धतींबद्दल महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे. मानवाने गहू किंवा तांदूळ यांसारखी पिके लागवड करण्याच्या खूप आधीपासून मुंग्यांनी शेती करण्याचं कौशल्य आत्मसात केलं होतं, असं या संशोधनात आढळलं आहे. हे छोटे जीव लाखो वर्षांपासून बुरशीची शेती करत आहेत, त्यांची व्यवस्था मानवी शेतीइतकीच जटिल आहे. स्मिथसोनियनच्या नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्रीमधील कीटकशास्त्रज्ञ टेड शुल्ट्झ यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या नव्या संशोधनानुसार सुमारे ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवर महाकाय उल्कापात झाला आणि डायनासोर नामशेष झाले; परंतु मुंग्यांसारख्या लहानग्या जीवाने मात्र तग धरून ठेवला. त्यामागे त्यांचे नियोजन कौशल्य, एकजुटीने केलेली मेहनत अशा अनेक गोष्टी आहेत. ◆◆◆



## 'काळे पाणी' शिक्षा नव्हे हेल्दी!



ब्रिटिश राजवटीत आपल्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. ही शिक्षा म्हणजे अंदमानवरील भयावह छळ केल्या जाणाऱ्या तुरुंगवासाची शिक्षा होय. त्यामुळे 'आरोग्यदायी काळे पाणी' म्हटल्यावर आपल्याला थोडे विचित्र वाटणे साहजिकच आहे. अर्थात, हे काळे पाणी केवळ रंगामुळेच तसे संबोधले जाते. खरे तर हे काळे पाणी म्हणजे 'अल्कलाईन वॉटर' आहे, जे आरोग्यासाठी लाभदायक ठरते.

विराट कोहली जे पाणी पितो त्याची किंमत ४,००० रुपये प्रति लिटर आहे. होय, हे सामान्य पाणी नाही. त्यात अनेक मिनरल्स म्हणजे खनिजे आहेत, त्यामुळे त्याचा रंग काळा आहे. यालाच काळे पाणी किंवा अल्कलाईन वॉटर असे म्हणतात. त्याचे हे पाणी फ्रान्समधून येते, अशी महिती मिळते. अल्कधर्मी पाण्याला क्षारीय अल्कलाईन पाणी असेही म्हणतात. सामान्यतः नैसर्गिक पाण्याचा पीएच ६.५ ते ८.५ दरम्यान असतो. अल्कधर्मी पाणी कार्बन डायऑक्साइड-बायकार्बोनेट-कार्बोनेट संतुलन प्रणालीद्वारे नियंत्रित केले जाते. उच्च पीएच असलेले हे पाणी बाटलीबंद स्वरूपातही उपलब्ध आहे. हे घरगुती उपचारांद्वारे नैसर्गिक स्वरूपात देखील तयार केले जाऊ शकते. विरघळलेल्या कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढल्याने पाण्याचा पीएच कमी होतो. परिणामी, पाणी आम्लयुक्त होते. याउलट, कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी झाल्यामुळे पाण्याचा पीएच वाढतो. अशा प्रकारे अल्कधर्मी पाणी तयार होते.

अल्कलाईन पाणी हे मुक्त रॅडिकल्स काढून टाकून चयापचय विकार सुधारते. यामुळे रक्तातील ग्लुकोज, कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइडची पातळी कमी होते. हे स्वादुपिंडाच्या बीटा पेशींचे ऑक्सिडेटिव्ह नुकसान होण्यापासून संरक्षण करते. हे कोलेस्ट्रॉल होमिओस्टॅसिस नियंत्रित करून वजन कमी करते. अल्कधर्मी पाणी मेलामाईनच्या उत्सर्जनाला गती देते आणि मूत्रात त्याचे संचय रोखते. यामुळे लघवीतील खडे होण्यास प्रतिबंध होतो. त्याचप्रमाणे या पाण्याने अंघोळ केल्याने त्वचेशी संबंधित समस्याही दूर होतात. प्रो- आणि अँटी-इंफ्लॅमेटरी साईटोकिन्स यांच्यात संतुलन राखून ते अतिनील विकिरणांशी संबंधित त्वचेचे नुकसान कमी करू शकते. ◆◆◆

## मिळणार चंद्रावरील खडकांचे नमुने



भारताच्या 'चांद्रयान-३' या मोहिमेत विक्रम लँडर यशस्वीरीत्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवालगतच्या भागात उतरले आणि त्यामधून बाहेर पडलेल्या प्रज्ञान रोव्हरने चौदा दिवस तिथे फिरून अनेक प्रकारची वैज्ञानिक माहिती गोळा केली. आता या यशानंतर भारतीय अवकाश संशोधन संस्था 'इस्रो' पुढचे पाऊल टाकत आहे. २०२८ मध्ये 'चांद्रयान-४' ही मोहीम होईल. या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यावेळी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील पाण्याचा बर्फ मोठ्या प्रमाणात असलेल्या भागातून तीन किलो वजनाचे खडक-मातीचे नमुने गोळा करून ते अभ्यासासाठी पृथ्वीवर आणण्यात येतील.

भारत सरकारने या मोहिमेला आधीच वित्तीय मंजुरी दिलेली आहे. या मोहिमेसाठी २१ अब्ज रुपये खर्च येणार आहे. या मोहिमेबाबत 'इस्रो'चे अध्यक्ष एस. सोमनाथ आशावादी आहेत. जे आजपर्यंत रशिया, अमेरिका किंवा चीनसारख्या देशांनी करून दाखवले ते या मोहिमेत भारतही करून दाखवेल, असा त्यांना विश्वास आहे. 'एलव्हीएम-३' या शक्तिशाली रॉकेटच्या साहाय्याने 'चांद्रयान-४' रवाना होईल. त्यामध्ये एक लँडर आणि खडक-मातीचे नमुने गोळा करणारे छोटे वाहन असेल. हे असेंडर व्हेईकल नमुने गोळा करून चांद्रभूमीवरून उड्डाण करील व ते हे नमुने 'रिएंट्री' मॉडेलमध्ये ठेवेल जे नंतर पृथ्वीवर परत येईल. चांद्रयान-४ चे लँडर ज्याठिकाणी चांद्रयान-३ उतरले होते त्या 'शिवशक्ती पॉईंट'जवळच उतरेल, असे म्हटले जाते. या मोहिमेनंतर 'चांद्रयान-५' मोहीम होईल, जी जपानच्या सहकार्याने होणार आहे. त्यावेळी ३५० किलो वजनाचे रोव्हर चांद्रभूमीवर पाठवले जाईल. ◆◆◆

## ‘ईव्हीएम’वरून नेत्यात मतभेद; जबाबदारी निश्चित करून कठोर निर्णय घेणार

# महाराष्ट्राच्या पराभवावरुन काँग्रेसचे चिंतन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव झाल्यानंतर पक्षाने नवी दिल्लीत आपल्या कार्यकारिणीची बैठक घेतली. आगामी निवडणुकीत पक्षाची स्थिती सुधारण्यासाठी कोणती पावले उचलायची यावर या बैठकीत विचारमंथन झाले. बैठकीत पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पराभवाच्या कारणांबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आणि आता जबाबदारी निश्चित केली जाईल आणि कठोर निर्णय घेतले जातील, असा इशारा दिला.

या बैठकीत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ‘इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन’वर (ईव्हीएम) गंभीर प्रश्न उपस्थित केले. निवडणूक प्रक्रियेच्या अखंडतेशी गंभीरपणे तडजोड केली जात असून यावर काँग्रेस लवकरच देशव्यापी आंदोलन करणार असल्याचे ते म्हणाले. ‘ईव्हीएम’मुळे निवडणूक प्रक्रिया संशयास्पद बनली असून, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका व्हाव्यात, हे निवडणूक आयोगाचे घटनात्मक कर्तव्य आहे, असे मत खर्गे यांनी व्यक्त केले. काँग्रेसचा असा दावा आहे, की पक्षाने निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर आंदोलन केले पाहिजे आणि ते ‘इंडिया’ आघाडीच्या इतर पक्षांसह या मुद्द्यावर प्रचार करतील.

बैठकीत राहुल गांधी यांनी पक्षाध्यक्षांना पराभवानंतरच्या परिस्थितीबाबत कठोर पावले उचलण्याची विनंती पक्षनेतृत्वाला केली. काँग्रेसने आपल्या धोरणांमध्ये बदल करून जबाबदारी निश्चित केली पाहिजे आणि निवडणुकीच्या निकालातून धडा घेतला पाहिजे.

दरम्यान, पक्षांतर्गत एकजूट नसल्याबद्दलही खर्गे यांनी चिंता व्यक्त केली आणि ते म्हणाले, की परस्पर वक्तृत्व आणि एकमेकांविरुद्धच्या टिप्पण्यांमुळे पक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. आपण जोपर्यंत आपल्यात एकजूट आणत नाही, तोपर्यंत आपण निवडणुकीच्या मैदानात यशस्वी होऊ शकत नाही. राष्ट्रीय प्रश्न आणि नेत्यांपेक्षा राज्यातील स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, असेही खर्गे यांनी पक्षश्रेष्ठींना सांगितले. त्यांनी काँग्रेस नेत्यांना त्यांच्या कामगिरीवर काटेकोर लक्ष केंद्रित करून रणनीती मजबूत करण्याचा सल्ला दिला.

खर्गे यांनी सर्वपक्षीय नेत्यांना भविष्यात काँग्रेसला बूथ स्तरापर्यंत बळकट करावे लागेल आणि रणनीती पूर्णपणे पद्धतशीर आणि वेळेचे बंधनकारक असेल याची काळजी घेण्यास सांगितले. ते म्हणाले, "आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतील आणि निवडणूक प्रक्रिया योग्य पद्धतीने पूर्ण करावी लागेल.

मतदार यादीपासून ते मतमोजणीपर्यंत प्रत्येक पातळीवर सतर्क राहावे लागेल." बैठकीत काही नेत्यांनी ‘ईव्हीएम’बाबत खर्गे यांच्या भूमिकेशी असहमत असतानाच त्याचे समर्थन केले. चिदंबरम यांनी खर्गे यांच्या ‘ईव्हीएम’बाबत केलेल्या विधानाला विरोध करत पक्षांतर्गत अशा विधानांमुळे नेतृत्वाच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होतो. त्याच वेळी, पक्षाचे प्रवक्ते जयराम रमेश आणि पवन खेरा म्हणाले, की काँग्रेस ‘ईव्हीएम’ आणि निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात राष्ट्रीय आंदोलन सुरू करेल आणि ‘इंडिया’ आघाडीचे इतर पक्षही त्यात सामील होतील.

### वेगळी रणनीती आखणार

● आगामी काळात सामाजिक न्याय, जातिगणना आणि बेरोजगारी यांसारख्या मुद्द्यांवर भर दिला जाईल. काँग्रेसमधील या अंतर्गत चर्चा आणि वादाच्या पार्श्वभूमीवर आता पक्षाला आपली रणनीती बदलून आगामी निवडणुकीत चांगली कामगिरी करता येईल का, हे ठरवायचे आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या दारुण पराभवानंतर पक्षांतर्गत सखोल आढावा प्रक्रिया सुरू झाली असून, त्यात केवळ नेतृत्वाची जबाबदारीच ठरवली जाणार नाही, तर निवडणूक प्रक्रिया आणि पक्षाच्या अंतर्गत परिस्थितीवरही गांभीर्याने चर्चा होणार आहे.

## रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमध्ये दोनशे गाड्या जळून खाक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**वाराणसी :** धर्म नगरी म्हणून ओळख असणाऱ्या वाराणसीमध्ये आज (शनिवार) सकाळी आग लागली. इथल्या केंट रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमध्ये सकाळच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग पार्किंगमध्येच लागल्याने या आगीत तब्बल दोनशेहून अधिक गाड्या जळून खाक झाल्या. या घटनेचा व्हिडीओही समोर आलेला आहे. त्यात आगीत गाड्या जळून खाक झाल्याचे दिसून येत आहे. सुदैवाने या दुर्घटणेत कोणीही जखमी अथवा मृत्यू झाल्याचे वृत्त नाही. पोलिस या घटनेची चौकशी करत आहेत; मात्र शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे कारण समोर आले आहे.

केंट रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमध्ये आग लागली, याची माहिती अग्निशमन दलाला मिळताच अग्निशमन दल आणि पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. मोठ्या प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले, तरीही या आगीत जवळपास २०० हून अधिक गाड्या जळून खाक झाल्या. यामुळे मोठे नुकसान झाले आहे; मात्र कोणीही जखमी झालेले नाही.

## मणिपूर हिंसाचारप्रकरणी आठ जणांना अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**इंफाळः** हिंसाचारग्रस्त मणिपूरमधील पोलिस ठाणे आणि आमदारांच्या निवासस्थानांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. १६ नोव्हेंबर रोजी निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या मालमत्तेची जाळपोळ केल्याप्रकरणी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील पाटसोई पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कियाम मामंग लीकाई येथील २० वर्षीय चोंगथम थोईचा याला अटक करण्यात आली होती.


इंफाळ खोऱ्यातील नद्यांमध्ये मैतेई समुदायाच्या सहा महिला आणि मुलांचे मृतदेह सापडल्यानंतर संतप्त जमावाने अनेक आमदारांच्या घरांची तोडफोड केली होती. ११ नोव्हेंबर रोजी जिरीबाम जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत कुकी अतिरेक्यांनी नागरिकांचे अपहरण केले होते. या चकमकीत १० कुकी अतिरेकीही मारले गेले.

गेल्या वर्षी मे महिन्यापासून इम्फाळ खोऱ्यातील मैतेई आणि आसपासच्या डोंगराळ भागात कुकी-जो गटांमधील वांशिक हिंसाचारात २५० हून अधिक लोक मारले गेले आहेत आणि हजारो लोक बेघर झाले आहेत. या अतिरेकी संघटनेचा प्रमुख कोरोउ न्गांबा खुमान आणि कुकी अतिरेकी राष्ट्रीय तपास संस्थेच्या चौकशीत आहेत, ज्यांना संघर्षग्रस्त मणिपूरमध्ये सुरक्षा दलांवर हल्ले आणि ‘आयईडी’ स्फोटांच्या चार प्रकरणांची चौकशी करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या चार प्रकरणांमध्ये इम्फाळमधील पहिल्या मणिपूर रायफल्स संकुलातून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा लुटणे, मोरेह येथील भारतीय राखीव बटालियनच्या चौकीवर हल्ला आणि बिष्णुपूरमधील ‘आयईडी’ स्फोट यांचा समावेश आहे.

गृहमंत्रालयाच्या दहशतवादविरोधी आणि कट्टरतावाद विरोधी विभागाने या चार प्रकरणांच्या तपासाची जबाबदारी अलीकडेच ‘एनआयए’कडे सोपवली होती. ‘एनआयए’ने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या हस्तांतरण याचिकेत म्हटले आहे, की खुमानचा समावेश असलेले पहिले प्रकरण गेल्या वर्षी १ नोव्हेंबर रोजी घडलेल्या घटनेशी संबंधित आहे.

## ✓ » Selected

### चार वर्षाच्या मुलाला जाळणाऱ्याला फाशी



**रायपूर :** छत्तीसगडमधील रायपूरमध्ये एका चार वर्षाच्या मुलाला जिवंत जाळणाऱ्या व्यक्तीला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. हा 'रेअरेस्ट ऑफ रेअर' केस मानून रायपूर न्यायालयाने आरोपी पंचराम गेंद्रेला फाशीची शिक्षा सुनावली. पंचराम गेंद्रे याने ५ एप्रिल २०२२ रोजी ४ वर्षीय हर्ष चेतनवर पेट्रोल शिंपडून जिवंत जाळले. हर्षची आई पुष्पा चेतन हिने त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याने त्याने हे घृणास्पद कृत्य केले. याचा राग गेंद्रेला आला आणि त्याने बदला म्हणून ही हत्या केली. हर्षचे वडील जयेंद्र चेतन यांनी पोलिसांत तक्रार दिली होती की, त्यांचे शेजारी पंचराम गेंद्रे हे त्यांची मुले दिव्यांश (५) आणि हर्ष (४) यांना बाहेरगावी जाण्याच्या बहाण्याने मोटारसायकलवरून घेऊन गेले. दिव्यांशला त्याच्या आईने परत बोलावले असता, हर्षने दुसरी राईड घेण्याचा आग्रह धरला आणि मग पंचराम त्याला एका निर्जन भागात घेऊन गेला. तेथे त्याने पेट्रोल आणून हर्षवर शिंपडले आणि त्याला पेटवून दिले.

### पिकाची राखण करणाऱ्या वृद्ध शेतकऱ्याची हत्या

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील हरदोई येथे एक खळबळजनक घटना समोर आली आहे. येथे हरपालपूरच्या बरनई गावात, आपल्या शेतातील पिकांचे रक्षण करणाऱ्या एका वृद्ध शेतकऱ्याची निर्घृण हत्या करण्यात आली. शेतकऱ्याचा चेहरा ठेचण्यात आला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला आहे. हरदोईच्या बरनई गावात ही घटना घडली. ६५ वर्षीय श्यामू उर्फ कल्लू राठोड गावातील कमलेशचंद्र मिश्रा यांच्या शेतात वाट्याने शेती करीत होते. श्यामू शेतातच झोपडी उभारून पिकांचे रक्षण करायचे.

### चुकून भारतात आलेल्या पाक नागरिक पाठवले परत

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेला लागून असलेल्या अमृतसरमध्ये एक पाकिस्तानी नागरिक चुकून भारतीय हद्दीत घुसला. सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांनी पाकिस्तानी नागरिकाला परत पाठवले. ‘बीएसएफ’च्या या पावलाचे पाकिस्तान रेंजर्सकडून कौतुक करण्यात आले. ‘बीएसएफ’ने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी नागरिक काल चुकून आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतीय हद्दीत घुसला होता. ‘बीएसएफ’च्या जवानांनी तातडीने कारवाई करत त्याला अटक केली. त्यानंतर प्रोटोकॉलनुसार तपास सुरू करण्यात आला.

## आई-बहिणीवरून शिव्या दिल्यास भोगा परिणाम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**अहिल्यानगर :** सध्या आपल्या दैनंदिन बोलण्या चालण्यात कोणीही सहजरित्या आई बहिणीवरून एकमेकांना शिवीगाळ करीत असतो. काही अश्लील शिव्या लहान मुलांच्या कानावर पडून मुलेसुद्धा अशा प्रकारच्या घाण शिव्या मुलांच्या तोंडी येतात. त्यामुळे आई व बहिणीच्या नावाने शिव्या देण्यास बंदी घातली पाहिजे, अशी संकल्पना समोर आणत नेवासे तालुक्यातील सौंदाळा ग्रामपंचायतीने गावात शिव्या देणाऱ्याला पाचशे रुपये दंड आकारण्यात येईल, असा आदर्श निर्णय घेतला आहे. सौंदाळाच्या ग्रामसभेत हा निर्णय घेण्यात आला. शिव्या देण्यावर बंदी घालून महिला भगिनींचा सन्मान करण्यात येत आहे, असे सरपंच शरद आरगडे यांनी म्हटले आहे.

या वेळी बालकामगार बंदीचादेखील ठराव घेण्यात आला.

बाल कामगार मुक्त गाव करण्यासाठी ‘बालकामगार दाखवा एक हजार रुपये मिळवा’ असे घोषवाक्य ठरवून बालकामगार निदर्शनास आल्यास त्याचा फोटो काढून ग्रामपंचायतीकडे आणून द्यावा त्या व्यक्तीस एक हजार रुपये बक्षीस दिले जाईल, असे ठरले. गावामध्ये बालविवाह शंभर टक्के बंदी करण्यात आलेले आहे.

### मुलांना मोबाईल देण्यावर निर्बंध

● ‘सोशल मीडिया’च्या आणि मोबाईलमुळे शालेय विद्यार्थी अभ्यास करत नसल्याचे निदर्शनास आल्याने यापुढे संध्याकाळी ७ ते ९ यावेळेत घरातील शालेय विद्यार्थ्याकडे मोबाईल द्यायचा नाही, असाही ठराव ग्रामसभेत घेण्यात आला. या सर्व ठरावांची सूचना सरपंच आरगडे यांनी मांडली.

## देशद्रोही संदेशावरून छापे

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**श्रीनगर :** देशद्रोही वर्तन केल्याच्या संशयावरून तसेच समाजात द्वेष पसरवणारे संदेश पाठवल्यावरून पोलिसांनी छापे टाकले.

## मुख्यमंत्री शिंदे यांचा कोणालाही भेटण्यास नकार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या आपल्या गावी दरे येथे आले आहेत. सत्तास्थापनेच्या गडबडीतच ते गावी आल्याने अनेक चर्चांना तोंड फुटले होते; पण गावी आल्यानंतर शिंदे यांची तब्येत बिघडल्याची माहिती मिळते आहे. त्यामुळे आज त्यांना कोणालाही भेटता येणार नाही, असे सूत्रांनी सांगितले आहे.

शिंदे यांची तब्येत आधीच काहीशी ठीक नसल्याने त्यांनी गावाला मुंबईतून गावाला जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितलं जात आहे. त्यामुळेच मुंबईतील महायुतीची बैठकही रद्द करण्यात आली. त्यानंतर



शिंदे यांनी अचानक साताऱ्यातील आपल्या दरे गावी जाण्याचा निर्णय घेतला. संध्याकाळी ते हेलिकॉप्टरने गावी पोहोचले; पण त्यांची प्रकृती अद्याप ठीक नाही. शिंदे यांना कणकणी आणि किरकोळ ताप आल्याची माहिती आहे. त्यामुळे शिंदे दरे गावातच विश्रांती घेत आहेत. ऐन राजकीय घडामोडींच्या काळातच शिंदे यांची प्रकृती बिघडल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, भाजपकडून मुख्यमंत्रिपदाचा चेहरा अद्याप जाहीर केला जात नसल्याने शिंदे नाराज असल्याचे कळते. कारण मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर झाल्याशिवाय पुढची चर्चा होणार नाही, असा पवित्रा शिंदे आणि अजित पवार यांनी घेतल्याचे समजते.

## ..तर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नव्हे !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** तुटलेली नातेसंबंध भावनिकदृष्ट्या वेदनादायक असतात; मात्र केवळ लग्नास नकार दिला किंवा ‘ब्रेकअप’ झाले, म्हणून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा ठरणार नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. आरोपीने तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा कोणताही ठोस पुरावा नाही, असे स्पष्ट करत तरुणीच्या आत्महत्येप्रकरणातील दोषी आरोपीची न्यायमूर्ती पंकज मिथल आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने निर्दोष मुक्तता केली.

प्रेम संबंधानंतर लग्नास नकार दिल्याच्या कारणातून २१ वर्षीय तरुणीने ऑगस्ट २००७ मध्ये जीवन संपवले. तरुणीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार कमरुद्दीन दस्तगीर सनदी याच्यावर कलम ४१७ (फसवणूक), ३७६ (बलात्कार) या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सत्र न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली. या निकालाला कर्नाटक सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

## मतदानाआधीच काँग्रेसला लागली होती पराभवाची कुणकुण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यात एकेकाळी राज्यात निर्विवाद सत्ता असलेल्या काँग्रेसचीही जबर पिछेहाट होऊन पक्षाला अवघ्या १६ जागांवर समाधान मानावे लागले होते. या पराभवानंतर काँग्रेसच्या नेत्यांकडून ‘ईव्हीएम’ आणि निवडणूक प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत होणाऱ्या पराभवाची कुणकूण काँग्रेसला मतदानाआधीच लागली होती की काय, अशी चर्चा आता रंगली आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान, काँग्रेसने केलेल्या एका अंतर्गत सर्व्हेमधील निष्कर्ष तसे होते.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होण्यापूर्वीच एक अंतर्गत सर्व्हे करण्यात आला होता. या सर्व्हेमध्ये काँग्रेसचा समावेश असलेली महाविकास आघाडी ही लोकसभा निवडणुकीत मिळालेली आघाडी कायम ठेवण्यात यशस्वी ठरणार नाही, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. तसेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आणलेली लाडकी बहीण योजना लोकांमध्ये आपला प्रभाव निर्माण करण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली असून, त्यामधून महिलांचे मतदान मोठ्या प्रमाणात महायुतीकडे वळणार असल्याचेही या सर्व्हेत म्हटले होते.

### महादेव जानकरांचा गंभीर आरोप

## ‘ईव्हीएम’घोटाळ्यामुळे महायुतीचा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने महाविकास आघाडीचा पराभव केला. महायुतीच्या विजयानंतर ‘ईव्हीएम’वर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधक टीका करत आहेत. ‘ईव्हीएम’च्या घोटाळ्यावरून आता महायुतीमधून बाहेर पडलेल्या राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी खळबळजनक दावा केला आहे. ‘ईव्हीएम’मध्ये घोटाळा झाल्यामुळे महायुतीचा विजय झाला असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. याचसोबत त्यांनी महायुतीमधून बाहेर पडण्यामागचे कारण सांगितले आहे.

जानकर यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. भाजप कोणाला मुख्यमंत्री करेल यात मला अजिबात पडायचे नाही; पण अनेक ठिकाणी ‘ईव्हीएम’मध्ये घोटाळा झाल्यामुळे महायुतीच्या जागा निवडून आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. जानकर यांनी सांगितले, की 'ईव्हीएम’वर माझा आक्षेप असून देशभरात ‘ईव्हीएम’विरोधात आंदोलन करणार आहे. ‘ईव्हीएम’मुळे देशाची लोकशाही धोक्यात आहे. ‘ईव्हीएम’ हॅक करता येते. मी स्वतः इंजिनीअर आहे. त्यामुळे मला सगळे माहिती आहे. सर्वोच्च न्यायालय निवडणूक आयोग सगळे त्यांचे आहेत. त्यामुळे याला लोकशाही म्हणता येणार नाही, अशी टीका त्यांनी केली.

महायुतीमधून बाहेर पडण्यामागचे कारण सांगताना जानकर म्हणाले, की मला महायुतीचा अनुभव खूप वाईट आला आहे. त्यामुळे मी त्यांच्यातून बाहेर आलो आहे. काँग्रेसला अजून चाखले नाही. त्यामुळे त्यांच्याकडे न जाता स्वतंत्र पुढे जायची आमची भूमिका आहे. त्यामुळे येत्या काळात आमची वाटचाल ‘एकला चलो’ची असेल. 'माझ्या पक्षाचा राज्यात सध्या एकच आमदार आहे. कोणासोबत जायचे याचा अजून निर्णय झालेला नाही; पण जर त्या आमदाराने पक्षाला न विचारता काही निर्णय घेतला, तर त्यावर नक्की आम्ही कारवाई करू.' असा इशारा जानकर यांनी दिला. त्यांनी रासपचे आमदार रत्नागर गुट्टे यांना हा इशारा दिला आहे.

